मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २९७ ■ शुक्रवार, १० जुलै २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# पाताळगंगा नदीत हजारो एचपीसीएल सिलेंडर वाहत आले

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** एचपीसीएल सारख्या मोठ्या कंपन्यांचा हलगर्जीपणा कालच्या पुराच्या पाण्यात उघडा पडला असून पाताळगंगा नदी दुथडी वाहू लागल्याने आहे. बुधवारी दुपारी अडीचच्या सुमारास खारपाडा पुलाखालून वाहणाऱ्या पाताळगंगा नदीतून 3 हजारांपेक्षा अधिक एचपीसीएल कंपनीचे गॅस सिलेंडर पाण्यासोबत वाहताना दिसले; आणि पूर्ण परिसरासह रायगड जिल्हा हादरला. मुंबई-गोवा महामार्गावरून जाणाऱ्या प्रवाशांनी डोळ्यांनी पाहिलेलं हे दृश्य पहिले हे सिलेंडर प्रचंड वेगाने वाहत एकमेकांना धडकत देत शर्यतीत उतरले होते. सुरुवातीला 4-5 सिलेंडर दिसले परंतु पुराच्या पाण्याचा वेग जसजसा वाढत चालला तसतशी सिलेंडरची संख्या ही वाढत चालली आणि काही वेळातचहा आकडा हजारांच्य घरात पोहचला पाणी वाढत होतं तसा सिलेंडरचा प्रवाहही वाढत होता.




सदरची घटना एचपीसीएल पाताळगंगा एलपीजी बॉटलिंग प्लॉट, चावणे ता.पनवेल जि.रायगड यांचे प्लॉट नं इ-1/7, अतिरिक्त एमआयडीसी, चावणे पाताळगंगा यामधून परिसरामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे अंदाजे 3000 (काही गॅस भरलेले व काही रिकामे गॅस सिलेंडर ) गॅस सिलेंडर पाताळगंगा नदीमध्ये वाहून आल्याची समजते; सदर गॅस सिलेंडर ज्या नागरिकांना सापडले असतील त्यांनी तात्काळ एचपीसीएल कंपनीकडे अथवा जवळच्या एचपीसीएल डिलरकडे /तहसिलदार कार्यालय, खालापूर, पेण तहसिलदार कार्यालय किंवा उपविभागीय अधिकारी, पेण यांचे कार्यालयास जमा करावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# उरण बस डेपो रात्री 'दारू अड्डा'? की अम्ली पदार्थानेचे साम्राज्य !

## 'अनोळखी गाड्यांचे पार्किंग' ! महिलांच्या सुरक्षेची जबाबदारी कोणाची?

**दैनिक युवक आधार**

**प्रदीप पाटील महाराष्ट्र प्रतिनिधी :** प्रवाशांच्या सोयीसाठी असलेला उरण बस डेपो सध्या अनोळखी गाड्यांचे पार्किंग आणि दारू पिणाऱ्यांचा अड्डा बनला आहे. संध्याकाळी आणि रात्रीच्या वेळी डेपो परिसरात बाहेरील चारचाकी आणि दुचाकी गाड्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून येत आहे. या गाड्या कोणाच्या आहेत आणि डेपोमध्ये त्यांना पार्किंग करन्य साठी कोणीपरवानगी दिली, याचे उत्तर मात्र एसटी प्रशासनाकडे नाही.



रात्रीच्या वेळी काही लोक दारूच्या बाटल्या घेऊन डेपोच्या कोपऱ्यात बसून मद्यपान करत असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. अंधार, अपुरी लाईट आणि दारू पिणाऱ्यांची वर्दळ यामुळे डेपो परिसराचे वातावरण धोकादायक झाले आहे.सगळ्यात गंभीर बाब म्हणजे रात्रीच्या शेवटच्या बसने उतरणाऱ्या महिला आणि मुलींना या डेपोमधून एकट्याने घरी जावे लागते. आजूबाजूला अनोळखी लोक आणि गाड्या असल्याने त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. उद्या काही अनुचित प्रकार घडला तर त्याची जबाबदारी कोण घेणार?

प्रवासी वाहतुकीचा डेपो हा फक्त एसटी बस आणि कर्मचाऱ्यांसाठी राखीव असतो. मग बाहेरील वाहनांना आत येण्याची मुभा कोणी दिली? सीसीटीव्ही आहेत का? रात्रीची सुरक्षा आहे का? या सगळ्या प्रश्नांवर एस टी प्रशासन गप्प आहे.

पहाटे आणि रात्री कामावर जाणाऱ्या येणाऱ्या महिला याच डेपोचा वापर करतात. दारू पिणारे लोक आणि अनोळखी गाड्या पाहून भीती वाटते. एसटी अधिकाऱ्यांनी तातडीने याची दखल घ्यावी" अशी मागणी प्रवाशांनी केली आहे. उरणसारख्या ठिकाणी महिलांची सुरक्षा सर्वात महत्त्वाची आहे. फक्त अपघात झाल्यावर कारवाई करण्यापेक्षा, आधीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

# आ.विक्रांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत साड्या वाटप

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** आ.विक्रांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने येत्या 10 जुलै रोजी माता-भगिनींसाठी मोफत साड्या वाटपाचा कार्यक्रम राबविण्यात येणार असून सदर कार्यक्रम पनवेल नगरपरिषदेचे मा.बांधकाम सभापती व भाजप महाराष्ट्र प्रदेश सदस्य सिद्धार्थ बांठीया यांच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे.




आ.विक्रांत पाटील यांचा वाढदिवस येत्या 12 जुलै रोजी असला तरी त्याच्या पूर्व संध्येला म्हणजेच 10 जुलै रोजी संध्याकाळी 5 वाजता रॉयल गार्डन लॉन्स, तहसील कार्यालयाजवळ पनवेल शहर पोलीस स्टेशन शेजारी हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे विविध मंत्री, आमदार, खासदार उपस्थित राहणार असून त्यांच्या उपस्थितीत व त्यांच्या हस्ते जवळपास 300 च्या वर माता-भगिनींना मोफत साड्या वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती पनवेल नगरपरिषदेचे मा.बांधकाम सभापती व भाजप महाराष्ट्र प्रदेश सदस्य सिद्धार्थ बांठीया यांनी दिली आहे. तसेच त्या निमित्ताने संगीत व स्नेह भोजन आयोजित करण्यात आले आहे. तरी जास्तीत जास्त पनवेलकरांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून शोभा वाढवावी, असे आवाहन आ.विक्रांत दादा पाटील युवा शक्ती संघ व आमदार विक्रांत दादा पाटील प्रतिष्ठान तर्फे करण्यात आले आहे.







# शिक्षकांच्या विविध मागण्यांसाठी आझाद मैदानावर डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचा आंदोलनाला जाहीर पाठिंबा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई किशोर गुडेकर, विभागीय संपादक :** राज्यभरातील शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आज मुंबईतील आझाद मैदानावर 'शिक्षक भारती'च्या नेतृत्वाखाली भव्य आंदोलन करण्यात आले. राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. आंदोलनस्थळी घोषणाबाजी, फलक आणि बॅनरच्या माध्यमातून शिक्षकांनी शासनाचे लक्ष आपल्या मागण्यांकडे वेधले.

सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत सुरू असलेल्या या आंदोलनात महिला शिक्षकांची उपस्थिती विशेष लक्षवेधी होती. "शिक्षक एकजुटीचा विजय असो", "लढेंगे... जिंकेंगे...", अशा घोषणांनी संपूर्ण आझाद मैदान परिसर दणाणून गेला. आंदोलन शांततेत पार पडावे यासाठी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.




आंदोलनादरम्यान शिक्षक भारतीच्या वतीने शासनाकडे अनेक महत्त्वाच्या मागण्या मांडण्यात आल्या. BLO आणि SIR या निवडणूक प्रक्रियेतील कामांतून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मुक्तता करावी, TET परीक्षेची सक्ती रद्द करावी, तसेच शिक्षकांवर दाखल करण्यात आलेले FIR मागे घ्यावेत, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या. शैक्षणिक कामकाज सोडून इतर प्रशासकीय कामांचा वाढता भार शिक्षकांवर टाकला जात असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत असल्याचे आंदोलकांनी सांगितले.

यावेळी माजी खासदार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ तथा मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून शिक्षकांच्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला.

शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांची शासनाने गांभीर्याने दखल घ्यावी, शिक्षण व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा भार कमी करावा आणि शिक्षकांशी सकारात्मक संवाद साधून प्रश्न तातडीने सोडवावेत, असे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांच्या उपस्थितीमुळे आंदोलनातील शिक्षकांचा उत्साह आणखी वाढल्याचे पाहायला मिळाले.

यावेळी शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शासनावर टीका करत, वारंवार निवेदने व बैठका घेऊनही शिक्षकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला. त्यामुळेच आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे त्यांनी सांगितले. शासनाने तातडीने निर्णय घेतला नाही, तर राज्यभर अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला.

आझाद मैदानावर झालेल्या या आंदोलनात राज्यातील विविध जिल्ह्यांमधून आलेल्या शिक्षकांनी मोठ्या शिस्तबद्ध पद्धतीने सहभाग नोंदविला. शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांना लवकरात लवकर न्याय मिळावा आणि शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित प्रश्न सोडवावेत, अशी एकमुखी मागणी आंदोलनस्थळी करण्यात आली. शासनाकडून शिक्षक प्रतिनिधींशी लवकरच सकारात्मक चर्चा होऊन तोडगा निघेल, अशी अपेक्षाही आंदोलकांनी व्यक्त केली.

# शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख किसनराव मोरे यांच्या मध्यस्थीने भगवान जाधव यांचे उपोषण स्थगित

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे :** जि.प.प्रा.शाळा शिवनगिरी येथे शिक्षकांची रिक्त पदे तात्काळ भरण्यात यासाठी भगवान दत्तराव जाधव यांनी पाच जुलैपासून शाळेसमोरच उपोषण सुरू केले होते, मात्र शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख तथा माजी पंचायत समिती सदस्य किसनराव मोरे यांच्या मध्यस्थीने अखेर उपोषण मागे घेण्यात आले. गट शिक्षणाधिकारी दत्तात्रेय क्षीरसागर यांनी तात्काळ दोन शिक्षकांना शिवनगिरी येथील शाळेवर तात्पुरती नियुक्ती दिली आहे.

शिवनगिरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतचे वर्ग असून अनेक वर्षापासून केवळ पाच शिक्षक कार्यरत आहेत. अपुरे शिक्षकांमुळे शाळेची गुणवत्ता ढासळत असून त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानी वर होत आहे. शाळेतील शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासंदर्भात अनेक वेळा निवेदन देण्यात आले. परंतु शिक्षण विभाग दुर्लक्ष करीत असल्यामुळे भगवान दत्तराव जाधव यांनी आमरण उपोषणाचा

**जि.प.प्रा.शाळा शिवनगिरी येथे शिक्षकांची रिक्त पदे तात्काळ भरण्यासाठी सुरू केले होते उपोषण**

निर्णय घेतला. पाच जुलै रोजी त्यांनी उपोषणही सुरू केले. या उपोषणाची माहिती मिळताच शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख तथा माजी पंचायत समिती सदस्य किसनराव मोरे यांनी गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय क्षीरसागर यांच्याशी संपर्क साधून शाळेत शिक्षकांची रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी अशी मागणी केली.

त्यांच्या प्रयत्नाला यश आले असून गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने तात्काळ दोन शिक्षकांची नियुक्ती केली आहे. त्यामुळे भगवान दत्तराव जाधव यांनी आपले आमरण उपोषण स्थगित केले आहे. यावेळी किसनराव मोरे यांच्यासह रमेशराव जाधव, पुरुषोत्तम देशमुख, अशोक काकडे, ज्ञानेश्वर जाधव, बाळासाहेब, शरद शिंदे, कैलास जाधव, विष्णू जाधव व केंद्रप्रमुख सस्ते गावातील प्रमुख व शिक्षक उपस्थित होते.

# दिघाटी गावातील तीन दिवस पुराचे पाणी न ओसरल्याने ग्रामस्थांचे हाल

## ग्रामपंचायत सदस्या मालती सुरेश पाटील यांच्याकडून स्वखर्चाने नाश्त्याची व्यवस्था

**दैनिक युवक आधार**

**पनवेल मच्छिंद्र पाटील तालुका प्रतिनिधी :** पनवेल तालुक्यातील दिघाटी गावात ४ जुलै ते ६ जुलै या तीन दिवसांच्या कालावधीत झालेल्या मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली. गावातील सखल भागात मोठ्या प्रमाणात पुराचे पाणी शिरल्याने सुमारे ७० ते ८० घरांना पुराचा फटका बसला असून ग्रामस्थांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

सतत तीन दिवस जोरदार पाऊस कोसळत असल्याने गावातील सखल भाग जलमय झाला होता. अनेक घरांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने घरातील जीवनावश्यक वस्तू व इतर साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. तब्बल तीन दिवस पाणी न





ओसरल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. सततच्या पावसामुळे ग्रामस्थांचे जनजीवन विस्कळीत झाले होते.

या कठीण परिस्थितीत दिघाटी ग्रामपंचायत सदस्या मालती सुरेश पाटील यांनी सामाजिक बांधिलकी जपत सलग तीन दिवस स्वखर्चाने पूरग्रस्त नागरिकांसाठी सकाळच्या नाश्त्याची व्यवस्था केली. नागरिकांना चहा, समोसा आणि बिस्किटांचे वाटप करण्यात आले.

"आपण याच गावाच्या ग्रामपंचायत सदस्या असून समाजाचे काहीतरी देणे लागतो,"

या सामाजिक भावनेतून मालती सुरेश पाटील यांनी पूरग्रस्त नागरिकांना मदतीचा हात दिला. त्यांच्या या सेवाकार्यात जीवन राजाराम म्हात्रे, विलास मारुती ठाकूर, सौरभ विष्णू पाटील, प्रशांत अनंत ठाकूर आणि नरेश नामा ठाकूर यांनी सहकार्य केले.

दिघाटी गावातील अनेक कुटुंबांचे पुरामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असून प्रशासनाने तातडीने नुकसानग्रस्त घरांचे पंचनामे करावेत आणि तलाठी व तहसील प्रशासनामार्फत योग्य ती नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी पूरग्रस्त ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# समाजकार्यातील उल्लेखनीय योगदानाबद्दल कोमल मोहनिष भोईर यांना 'टॉप 30 इन्स्पायरिंग वुमन अवॉर्ड 2026' प्रदान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** समाजसेवेच्या क्षेत्रात सातत्याने आणि निःस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या कोमल मोहनिष भोईर यांना 'Top 30 Inspiring Women Awards 2026 अंतर्गत "Top Achiever Award 2026 – Inspirational Social Activist of the Year" या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. त्यांच्या समाजहिताच्या कार्याची दखल घेत हा प्रतिष्ठेचा सन्मान प्रदान करण्यात आला.

कोमल मोहनिष भोईर या अनेक वर्षांपासून समाजातील गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबवत आहेत. महिलांचे सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य जनजागृती, गरजूंना मदत, सामाजिक बांधिलकी आणि मानवसेवा या क्षेत्रांत त्यांनी सातत्याने मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक गरजू कुटुंबांना आधार मिळाला असून समाजात सकारात्मक




बदल घडवून आणण्याचा त्यांचा प्रयत्न कायम राहिला आहे.

हा पुरस्कार त्यांच्या निःस्वार्थ सेवाभाव, नेतृत्वगुण, समाजाप्रती असलेली बांधिलकी आणि प्रेरणादायी कार्याचा गौरव म्हणून प्रदान करण्यात आला आहे. हा सन्मान केवळ त्यांच्या वैयक्तिक यशाचा नसून, समाजहितासाठी कार्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा सन्मान असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

यावेळी कोमल मोहनिष भोईर म्हणाल्या, "हा पुरस्कार माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक सहकाऱ्याचा, कुटुंबाचा आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीचा आहे. समाजासाठी केलेले कार्य हीच माझी खरी ओळख असून, यापुढेही अधिक जोमाने आणि प्रामाणिकपणे समाजसेवा करण्यासाठी हा सन्मान मला नवी प्रेरणा देईल."त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, भविष्यातही त्यांच्या हातून समाजोपयोगी कार्य अधिक व्यापक स्वरूपात घडावे, अशा शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत. हा पुरस्कार त्यांच्या समाजसेवेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, त्यांच्या कार्यातून अनेक युवक-युवतींना समाजासाठी काम करण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# केंद्रिय विद्यालयाची प्रवेशप्रक्रिया लवकरच सुरू होणार !! विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची सुविधा !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी :** अकोला येथे केंद्रीय विद्यालय सुरू करण्यास केंद्रीय विद्यालय संघटनतर्फे मंजुरी व अधिसूचना जारी करण्यात आली आहे. त्यामुळे अकोल्यातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण सुविधा उपलब्ध होणार आहे. तेथील प्रवेशप्रक्रिया तत्काळ सुरू करण्यासाठी गतीने प्रक्रिया राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले.

केंद्रिय विद्यालयाच्या इमारत, प्रवेशप्रक्रिया आदी व्यवस्थेच्या अनुषंगाने बैठक जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत बैठक झाली, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी




अनय नावंदर, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार, साबांवि कार्यकारी अभियंता प्रसाद पाटील, विद्यालयाचे प्राचार्य बालाजी मारकवार आदी अधिकारी उपस्थित होते.

यंदा प्रवेशप्रक्रिया सुरू होण्यासाठी शाळेसाठी हरिहरपेठेतील जि. प. शाळेची जागा तात्पुरत्या स्वरूपात निश्चित करण्यात आली असून, तिथे लवकरच शाळा सुरू होणार आहे. शाळेची प्रवेशप्रक्रियाही लवकरच सुरू होईल. त्यादृष्टीने आवश्यक प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. इमारतीत कार्यालय आणि वर्ग सुरळीत सुरू होण्यासाठी सर्व कक्ष सुसज्ज करावे. विद्यार्थ्यांसाठी आवश्यक साहित्याची तजवीज ठेवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी दिले.

विद्यालय पूर्णपणे कार्यान्वित होण्यासाठी आवश्यक तांत्रिक प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करावी. विद्यालयाबाबत सर्वदूर माहिती प्रसारित करून प्रवेशप्रक्रियेला लवकर सुरूवात करावी जेणेकरून प्रवेशानंतर प्रत्यक्ष सत्र सुरू होऊ शकेल.

केंद्रीय विद्यालयासाठी गुडधी येथे जागा मंजूर करण्यात आली असून, तिथे कायमस्वरूपी इमारत निर्माण होणार आहे. शाळा पहिल्या टप्प्यात इयत्ता १ ली ते ५ वी च्या वर्गांसह (प्रत्येक इयत्तेची एक तुकडी) सुरू केली जात आहे. प्रत्येक वर्गाची प्रवेश क्षमता ४० आहे. विद्यालयाच्या कार्यालयाचे कार्यान्वयन, तांत्रिक बाबींची पूर्तता जलदपणे आटोपून लवकरच प्रवेशप्रक्रियेची माहिती व तारखा जाहीर करण्यात येतील, अशी माहिती प्राचार्य श्री.मारकवार यांनी दिली.

# विद्युत पुरवठा वारंवार होत आहे खंडित

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालेले असताना तालुक्यातील विद्युत पुरवठा देखील वारंवार खंडित होत आहे याचा त्रास वीज ग्राहकांना होत आहे.

गेल्या आठवड्याभरा पासून पनवेल तालुक्यात धो धो पाऊस बरसत आहे. याचा फटका अनेकांना बसला. अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचले तर अनेक गावांमध्ये देखील पाणी गेले. त्यातच दिवसा आणि रात्रीच्या वेळेस वीस पुरवठा वारंवार खंडित होत आहे. अनेक ठिकाणी विद्युत तारा तुटणे, विजेचे खांब पडणे, डीपी वरील फ्यूज उडणे यासारख्या घटना वारंवार घडत आहेत. बाहेर मुसळधार पाऊस कोसळत असताना घरात वीज गायब झाल्याने वीज ग्राहकांवर दुहेरी संकट ओढवले आहे. विद्युत पुरवठा खंडित झाल्याने अनेकांना महत्त्वाची कामे करण्यात अडथळा निर्माण होत आहे.

अनेक वेळा वीज खंडित होत असल्याने घरगुती कामकाज, व्यावसायिक व्यवहार तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही परिणाम होत आहे. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या या वीज खंडित होण्याच्या प्रकारामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. वारंवार वीज गेल्यामुळे पाणीपुरवठा, इंटरनेट सेवा आणि लहान उद्योग-व्यवसायांवरही त्याचा परिणाम होत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. स्थानिकांनी महावितरणकडे अनेक वेळा तक्रारी करूनही समस्येचे कायमस्वरूपी निराकरण झाले नसल्याचा आरोप केला आहे. पावसाळ्यात वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक दुरुस्ती व देखभाल कामे तातडीने करण्यात यावीत, तसेच वारंवार होणारा वीजपुरवठा खंडित होण्याचा प्रकार थांबवावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# स्वस्तिका ललित हारोडे हिचे शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्याद्वारे घेण्यात आलेल्या 'पूर्व-उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत' (इयत्ता ५ वी) नागपूर येथील 'ग्रेट ब्रिटन इंग्लिश प्रायमरी स्कूल'ची विद्यार्थिनी स्वस्तिका ललित हारोडे हिने प्रथम क्रमांक पटकावून शिष्यवृत्ती मिळवली आहे. तिने आपल्या या यशामुळे कुटुंब, शाळा आणि शहराचे नाव उंचावले आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी दिलेल्या प्रमाणपत्रांनुसार, स्वस्तिकाने आपल्या कठोर परिश्रमातून आणि निष्ठेतून ही शिष्यवृत्ती संपादन केली आहे. शाळेचे प्रशासक विजयाश्री थोबरे व मुकुंद थोबरे, मुख्याध्यापिका इशरत जहाँ आणि शिक्षिका कल्याणी फांडे, मेघा बावरिया व अश्विनी यांनी स्वस्तिकाचे अभिनंदन करून तिला उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

नियमित अभ्यासाची सवय, शिस्त आणि शाळेकडून मिळालेले सततचे मार्गदर्शन या गोष्टी तिच्या यशात अत्यंत महत्त्वाच्या ठरल्याचे शिक्षकांनी नमूद केले.



स्वस्तिकाची आई रूपा पंडित हारोडे - ज्या स्वतः माध्यम क्षेत्राशी निगडित एक वरिष्ठ पत्रकार आहेत - यांनीही सुरुवातीपासूनच आपल्या मुलीमध्ये सामान्य ज्ञान, चालू घडामोडी आणि शैक्षणिक विषयांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी सतत प्रयत्न केले. कुटुंब आणि शाळा यांच्या एकत्रित मार्गदर्शनाचेच हे फळ आहे की स्वस्तिकाने ही उल्लेखनीय कामगिरी करून दाखवली आहे.


निश्चय, शिस्त, कुटुंबाचा पाठिंबा आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यांच्या जोरावर कोणतेही ध्येय साध्य करता येते, हे स्वस्तिकाच्या यशावरून सिद्ध झाले आहे. स्वस्तिका ललित हारोडे हिचे या शानदार यशाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन आणि तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी खूप खूप शुभेच्छा.

# रस्त्यावर ट्रक-ट्रेलर पार्किंगला पोलिसांचे संरक्षण? स्थानिकांचा गंभीर आरोप

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / साबीर शेख :** कोन ट्राफिक पोलीस चौकी ते सावळे येथील अष्टे लॉजिस्टिक यार्ड परिसरात रस्त्यावर ट्रक-ट्रेलर पार्क करण्यास पोलीस वाहतूक विभागाचे संरक्षण मिळत असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे.

बेकायदेशीर पणे शेकडो ट्रक-ट्रेलर रस्त्याच्या कडेला उभे असल्याचे चित्र सातत्याने दिसत असून, त्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. रस्ते सुरक्षा नियमांची पायमल्ली करून प्रवासी व स्थानिक नागरिकांच्या जीवाशी





खेळ केला जात असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे.

काही दिवसांपूर्वी लोकप्रतिनिधी, संबंधित व्यवस्थापन आणि पोलीस अधिकाऱ्यांची या विषयावर तू तू मे मे झाली होती त्यानंतर स्थानिक आमदार व त्या शिष्टमंडळाने बैठक पार पडली होती. मात्र, त्या बैठकीत नेमके कोणते निर्णय घेण्यात आले आणि त्याची अंमलबजावणी का होत नाही, याबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.रस्त्यावर बेकायदेशीर पार्किंगमुळे अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत असून, भविष्यात जीवितहानी झाल्यास त्याला जबाबदार कोण, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. अशा उद्योगधंद्यांना शिस्त लावण्याऐवजी त्यांना अभय दिले जात आहे का, अशीही चर्चा परिसरात सुरू आहे.

स्थानिकांनी प्रशासनाने तातडीने कारवाई करून रस्त्यावरील बेकायदेशीर पार्किंग हटवावे, संबंधितांवर कठोर कारवाई करावी आणि रस्ते सुरक्षा नियमांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी केली आहे.

# पत्नी नांदायला येत नाही म्हणुन युवक हाय व्होल्टेज लाईनच्या टावर वर चढला

## माहूर तालुक्यातील मौजे शेख फरीद वझरा येथील घटना

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर प्रतिनिधी: सय्यद इसा :** माहूर तालुक्यातील मौजे शेख फरीद वझरा येथील युवक पत्नी नांदायला येत नसल्याने जीव देण्याच्या उद्देशाने हाय व्होल्टेज टावर वर चढून त्याने नागरिकांना आकर्षित करून पत्नी नांदायला येत नसल्याचे सांगण्याचा जीव धोक्यात घालून प्रयत्न केला नागरिकांनी त्यांची समजूत काढून खाली उतरविल्याने मोठी दुर्घटना टळल्याने खळबळ उडाली आहे.

मौजे वझरा येथील युवक चंद्रकांत चरण चव्हाण वय 27



वर्ष याची पत्नी विशाखा ही आनमाळ येथे राहत असून ती चंद्रकांत ला अनेक दिवसापासून सोडून गेली होती सहन न झाल्याने त्याने हाय व्होल्टेज टावर वर चढून आरडा ओरड करत जीव देण्याचा प्रयत्न केला परंतु नागरिकांच्याही बाब लक्षात आल्याने त्यांनी लगेच आरडा ओरड करून त्याची समजूत काढून त्याला टावर वरून खाली उतरवले अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती चंद्रकांत चव्हाण याचे पत्नीसोबत अनेक वेळा भांडण झाल्याने त्याने दोन वेळा विष घेण्याचा प्रयत्न केला होता तर एक वेळ गळफास लावून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता अशी माहिती मिळत असून हाय व्होल्टेज टावर वर चढून जीव देण्याचा प्रयत्न केल्याने जीव जाण्याआधी पोलिसांनी मध्यस्थी करून त्यांचा संसार जुळवून द्यावा अशी मागणी गावकऱ्यातून होत आहे. चंद्रकांत च्या पश्चात आई-वडील भाऊ पत्नी आणि तीन मुले असा परिवार आहे घटनास्थळी माहूरचे पीआय चोपडे साहेब व बीट जमादार खंदारे साहेब व त्यांचे सर्व टीम घटनास्थळी पोहोचून त्याचबरोबर सरपंच पोलीस पाटील आणि आनमाळ चे पोलीस पाटील व सर्व नागरिक त्या ठिकाणी येऊन त्याचा जीव वाचवला आणि त्यांना सुखरूप घरी सोडण्यात आले.

# दिग्रस तालुक्यातील अनेक गावांत अंधाराचे साम्राज्य; ग्रामपंचायतींचे पथदिव्यांकडे अक्षम्य दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**
**दिग्रस तालुका प्रतिनिधी उमेश साखरकर** : सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असून तालुक्यातील अनेक ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये मुख्य रस्ते आणि गल्लीबोळांमधील पथदिवे (स्ट्रीट लाईट्स) गेल्या अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत आहेत. या गंभीर समस्येकडे स्थानिक ग्रामपंचायत प्रशासन पूर्णपणे दुर्लक्ष करीत असल्यामुळे नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. पावसाळ्याच्या रात्री गावात पसरणाऱ्या या अंधारामुळे सर्वसामान्य ग्रामस्थांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

पावसाळ्यात अपघातांची आणि सरपटणाऱ्या प्राण्यांची भीती पावसाळ्याच्या दिवसांत ग्रामीण भागात आधीच चिखल आणि पाण्याचे साम्राज्य असते. त्यातच रात्रीच्या वेळी पथदिवे बंद असल्याने गावातील रस्ते अंधारात बुडून जातात. पावसाळ्यात साप, विंचू यांसारखे विषारी सरपटणारे प्राणी बाहेर निघण्याचे प्रमाण मोठे असते. अंधारामुळे या प्राण्यांचा दंश होण्याचा धोका वाढला आहे.रात्रीच्या वेळी अचानक दवाखान्यात किंवा इतर कामासाठी बाहेर पडणाऱ्या वृद्ध, महिला आणि लहान मुलांना रस्त्याचा अंदाज येत नसल्याने पडझड होऊन दुखापत होण्याच्या घटना घडत आहेत.अंधाराचा फायदा घेऊन गावात चोऱ्या किंवा अनुचित प्रकार घडण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.दरवर्षी ग्रामपंचायतींमार्फत गावातील पथदिव्यांच्या दुरुस्तीसाठी आणि नवीन दिवे बसवण्यासाठी लाखो रुपयांचा निधी खर्च दाखवला जातो. मात्र, प्रत्यक्षात पावसाळ्याच्या तोंडावर या दिव्यांची दुरुस्ती का करण्यात आली नाही, असा संतप्त सवाल ग्रामस्थ विचारत आहेत. अनेक गावांमध्ये केवळ वीज बिल थकल्याचे कारण पुढे केले जाते, तर काही ठिकाणी बल्ब निकामी होऊनही ते बदलण्याची तसदी ग्रामपंचायत प्रशासनाने घेतलेली नाही.दिग्रस तालुक्यातील संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणात तात्काळ लक्ष घालून सर्व ग्रामपंचायतींना पथदिवे तातडीने सुरू करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी तालुक्यातील त्रस्त ग्रामस्थांकडून केली जात आहे. पावसाळा अधिक तीव्र होण्यापूर्वी हा प्रश्न सुटला नाही, तर एखादी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# शाश्वत कृषी विकासाला चालना: पोस्को महाराष्ट्र स्टील तर्फे १३,६९३ फळझाडे व औषधी वनस्पतींचे वाटप

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :-सचिन पवार** : पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने महाराष्ट्र शासनाच्या 'माझी वसुंधरा अभियान' आणि 'शाश्वत कृषी विकास' या धोरणांशी सुसंगत पाऊल उचलत ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवला आहे. कंपनीने आपल्या CSRउपक्रमांतर्गत माणगाव तालुक्यातील ३० ग्रामपंचायतींतील १,२०० हून अधिक शेतकऱ्यांना ४५ प्रजातींची १३,६९३ फळझाडे व औषधी वनस्पती मोफत वितरित केली आहेत.



या उपक्रमामागे पर्यावरण संवर्धन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांना उत्पन्नाचे शाश्वतपर्यायीसाधन उपलब्ध करून देणे हा दुहेरी उद्देश आहे. गेल्या चारवर्षांपासूनसातत्याने सुरू असलेल्या या लोककल्याणकारी उपक्रमातून आतापर्यंत ग्रामीण भागात ३५,००० पेक्षा अधिक फळझाडांचे यशस्वी वितरण करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांना शोभेची झाडे न देता आर्थिक मूल्य असलेली नगदी फळझाडे देण्यात आली आहेत. यामध्ये आंबा, फणस, पेरू, चिकू, जांभूळ, नारळ यांसारख्या झाडांचा समावेश असून येत्या काही वर्षांत ही झाडे वाढून शेतकऱ्यांसाठी नियमित व भक्कम उत्पन्नाचा स्रोत ठरतील. परिणामी, पारंपरिक शेतीवरचे अवलंबित्व कमी होऊन शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिक सक्षम होण्यास मदत होईल.

या उपक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे फळझाडांसोबतच उपयुक्त व औषधी वनस्पतींचेही वाटप करण्यात आले आहे. यात हळद, तमालपत्र, काळीमिरी, पानवेल, रिठा, हिरडा, शतावरी अशा विविध वनस्पतींचा समावेश आहे. या वनस्पतींच्या माध्यमातून शेतकरी आंतरपीक घेऊन कमी जागेत अधिक नफा मिळवू शकतील.

या उपक्रमाच्या पुढील टप्प्यात, कंपनीने येत्या ऑगस्ट महिन्यात आणखी २,५०० झाडांचे वितरण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

उपक्रमाबाबत बोलताना पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले, "हवामान बदलाच्या काळात केवळ वृक्षारोपण पुरेसे नाही; लागवड झालेली झाडे लोकांच्या जिव्हाळ्याचा आणि उपजीविकेचा भाग बनली पाहिजेत. शेतकऱ्यांना यातून हक्काचे उत्पन्न मिळवून देणे आणि गावांचा परिसर हिरवागार करणे हाच आमचा मुख्य हेतू आहे. शेतकरी बांधवांचा वाढता सहभाग आमचा उत्साह द्विगुणित करतो."

ग्रामीण भागाला आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर बनवतानाच पर्यावरण संरक्षणाला चालना देणारा हा उपक्रम खऱ्या अर्थाने कौतुकास पात्र ठरला आहे.

# दुधाच्या प्लास्टिक पिशव्यांवरील बंदीचा निर्णय; पर्यायी व्यवस्था होईपर्यंत मुदत देण्याची विधानसभेत जोरदार मागणी

**पनवेल | प्रतिनिधी दिपक कोळवणकर** : राज्यात दुधाच्या पॅकेजिंगसाठी वापरण्यात येणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांवर बंदी घालण्याच्या अन्न व औषध प्रशासनाच्या निर्णयाचे पडसाद थेट राज्य विधानसभेत उमटले. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त श्री तुकाराम मुंढे यांनी दुधाच्या प्लास्टिक पिशव्यांवर बंदी करण्याचे आदेश दिल्यानंतर दूध उत्पादक, सहकारी दूध संघ आणि दुग्ध व्यवसायाशी संबंधित घटकांमध्ये चिंता व्यक्त करण्यात आली आहे.




याबाबत विधानसभेत मुद्दा उपस्थित करत ठाकरे सेनेचे आमदार सुनील प्रभू यांनी सरकारचे लक्ष वेधले. त्यांनी सांगितले की, पर्यावरण संरक्षण महत्त्वाचे असले तरी दुधाच्या प्लास्टिक पिशव्यांवर तातडीने बंदी घालणे व्यवहार्य ठरणार नाही. पर्यायी पॅकेजिंगची व्यवस्था उपलब्ध होईपर्यंत दूध उत्पादकांना पुरेसा कालावधी देणे आवश्यक आहे. अन्यथा दूध व्यवसायावर तसेच ग्राहकांवर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो.

यावेळी राज्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही या भूमिकेला दुजोरा दिला. त्यांनी सभागृहात स्पष्ट केले की, पर्यायी व्यवस्था उपलब्ध होईपर्यंत दूध उत्पादकांनी सध्याच्या प्लास्टिक पिशव्यांचाच वापर करावा. तसेच या विषयावर मुख्यमंत्री यांच्याशी सविस्तर चर्चा करून सर्व संबंधित घटकांचे मत विचारात घेऊन अंतिम निर्णय घेतला जाईल.

दूध उद्योगाशी संबंधित प्रतिनिधींचे म्हणणे आहे की, लाखो लिटर दूध दररोज ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सध्या प्लास्टिक पिशव्यांचा सर्वाधिक वापर केला जातो. पर्यायी पॅकेजिंगचा खर्च अधिक असून त्यासाठी आवश्यक यंत्रसामग्री, उत्पादन प्रक्रिया आणि वितरण व्यवस्थेत मोठे बदल करावे लागतील.

त्यामुळे कोणताही निर्णय टप्प्याटप्प्याने आणि सर्व संबंधितांना विश्वासात घेऊनच राबविण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.


दरम्यान, पर्यावरण संरक्षण आणि प्लास्टिकमुक्त महाराष्ट्र हे शासनाचे उद्दिष्ट असले तरी त्याची अंमलबजावणी करताना दूध उत्पादक, सहकारी संस्था, खासगी डेअऱ्या आणि ग्राहक यांच्या हिताचा समतोल राखणे आवश्यक असल्याची भावना विधानसभेत व्यक्त करण्यात आली.

आता मुख्यमंत्री यांच्यासोबत होणाऱ्या चर्चेनंतर शासन अंतिम भूमिका स्पष्ट करणार असून, तोपर्यंत दुधाच्या प्लास्टिक पिशव्यांवरील बंदीच्या निर्णयाबाबत पुढील दिशा काय असेल, याकडे दूध उद्योगासह संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# हिंगोली, नांदेड, परभणी जिल्ह्यांना मध्यरात्री भूकंपाचे सौम्य धक्के; नागरिकांनी घाबरू नये – जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी – प्रकाश गवारे** : हिंगोली, नांदेड आणि परभणी जिल्ह्यांमध्ये गुरुवार, दि. 09 जुलै 2026 रोजी मध्यरात्री भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्राकडून प्राप्त माहितीनुसार, रात्री 1:37, 2:15 आणि 2:17 वाजता भूकंपाचे धक्के नागरिकांना जाणवले.

अधिकृत वृत्तानुसार, रिष्टर स्केलवर भूकंपाची तीव्रता अनुक्रमे 4.6, 3.6 आणि 3.9 इतकी नोंदविण्यात आली आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील शिरली येथे होता.




या भूकंपामुळे कोणतीही जीवितहानी किंवा वित्तहानी झाल्याची माहिती अद्याप प्राप्त झालेली नसून, जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्राने प्राथमिक अहवालात परिस्थिती नियंत्रणात असल्याचे स्पष्ट केले आहे.भूकंपाचे धक्के मध्यरात्री जाणवल्यामुळे अनेक नागरिक झोपेत होते. सलग धक्के जाणवल्याने काही ठिकाणी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखावी आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

नांदेडचे जिल्हाधिकारी श्री. राहुल कर्डिले यांनी नागरिकांना घाबरून न जाता सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. भूकंपाची पूर्वकल्पना देणे शक्य नसल्याने धक्के जाणवताच तातडीने घराबाहेर पडून मोकळ्या व सुरक्षित जागेत थांबावे, तसेच प्रशासनाने जारी केलेल्या सूचनांचे पालन करावे, असे त्यांनी सांगितले.

प्रशासनाकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून, नागरिकांनी कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास संबंधित प्रशासनाशी तात्काळ संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# शिक्षण,संस्कार जीवनसमृद्धीचे आधारस्तंभ.प्रा.सारिका बकवाड

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधीमहादेव उप्पे देगलूर** : युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत मेरा युवा भारत (MY Bharat) केंद्र,नांदेड यांच्या वतीने भारताचे महान राष्ट्रचिंतक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे सहआयोजन सलगरे फिजिक्स क्लासेस,नांदेड यांनी केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.महेश टेकाळे हे होते.प्रमुख पाहुण्या म्हणून जिल्हा युवा अधिकारी अश्नी कानकाटे तसेच प्रसिद्ध लेखिका व कवयित्री प्रा. सारिका बकवाड उपस्थित होत्या.यावेळी प्रा. सारिका बकवाड यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व,मूल्याधिष्ठित जीवन,संस्कारांची जपणूक,व्यक्तिमत्त्व विकास आणि ध्येयपूर्तीसाठी सातत्यपूर्ण परिश्रम याविषयी प्रेरणादायी मार्गदर्शन केले."शिक्षण,संस्कार जीवनसमृद्धीचे आधारस्तंभ आहेत.ज्ञानासोबत चारित्र्य,शिस्त आणि सामाजिक बांधिलकीची जोपासना केल्यासच यशस्वी व जबाबदार नागरिक घडतात,"असे त्या म्हणाल्या. त्यानंतर मान्यवरांनी डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या राष्ट्रसेवेचा आदर्श आणि युवकांच्या राष्ट्रनिर्मितीतील भूमिकेवर मार्गदर्शन केले. उपस्थित विद्यार्थी व युवक-युवतींनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले.शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# पावसाळा सुरू... पण रस्त्यांवरील खड्डे कायम; १३ जुलैपर्यंत दुरुस्ती करा, अन्यथा १४ रोजी 'शिवसेना स्टाईल' आंदोलनाचा इशारा!

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित** : पावसाळ्याला सुरुवात होऊनही श्रीवर्धन शहरातील अनेक प्रमुख रस्त्यांवरील खड्ड्यांची अवस्था 'जैसे थे'च असल्याने वाहनचालक आणि नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. पावसाचे पाणी खड्ड्यांमध्ये साचत असल्याने खड्ड्यांचा अंदाज येत नाही आणि वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागत आहे. त्यामुळे गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.



या गंभीर प्रश्नाकडे श्रीवर्धन नगरपालिकेचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने शहरप्रमुख शिवराज संदीप चाफेकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी नगरपालिकेला निवेदन सादर केले.

निवेदनात शहरातील सर्व धोकादायक खड्डे १३ जुलैपर्यंत तातडीने बुजविण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा १४ जुलै रोजी 'शिवसेना स्टाईल' आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

यावेळी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनावर टीका करत, पावसाळ्यापूर्वी रस्त्यांची दुरुस्ती होणे अपेक्षित असताना नगरपालिकेने आवश्यक उपाययोजना केल्या नसल्याचा आरोप केला. नागरिकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या या निष्काळजीपणाची जबाबदारी कोण घेणार, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.आता प्रशासन १३ जुलैपूर्वी खड्डे बुजवून नागरिकांना दिलासा देणार की आंदोलनाची वाट पाहणार, याकडे श्रीवर्धनकरांचे लक्ष लागले आहे.

# अजिंठा अप्पर तहसीलला विरोध; गावे सिल्लोड तहसीलमध्येच कायम ठेवावीत

## भाजप मंडळाध्यक्ष एकनाथ हिवाळेंचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : अजिंठा अप्पर तहसीलमध्ये समाविष्ट करण्यात आलेली गावे पूर्ववत सिल्लोड तहसीलमध्येच कायम ठेवावीत, या मागणीसाठी भारतीय जनता पार्टीचे मंडळाध्यक्ष एकनाथ रामदास हिवाळे यांनी उपविभागीय अधिकारी, सिल्लोड यांना निवेदन सादर केले.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सिल्लोड हे तालुक्याचे मुख्य केंद्र असून येथे तहसील कार्यालय, उपजिल्हा रुग्णालय, पंचायत समिती, भूमी अभिलेख कार्यालय, कृषी विभाग, शासकीय बँका, शैक्षणिक संस्था तसेच विविध शासकीय कार्यालये कार्यरत आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिकांची बहुांश शासकीय कामे सिल्लोड येथेच पूर्ण होतात.

सराटी, लिहाखेडी, खेडी लिहा, मांडणा, चिंचपूर, बहूली, मोहोळ, हट्टी, सासुरवाड, वडाळा, बोजगाव, रेलगाव, घाटांब्री, पांगरी, खुल्लोड, सारोळा, उंडणगाव, गोळेगाव बुद्रुक, गोळेगाव खुर्द, पालन, पानवडोद बुद्रुक व पानवडोद खुर्द या गावांचा महसुली कारभार अजिंठा अप्पर तहसीलमार्फत झाल्यास शेतकरी, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य नागरिकांना अनावश्यक प्रवास करावा लागेल. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा अपव्यय होऊन नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागेल.

त्यामुळे नागरिकांच्या प्रशासकीय सोयीचा विचार करून संबंधित सर्व गावे पूर्ववत सिल्लोड तहसीलमध्येच कायम ठेवावीत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनावर भाजपचे उपसभापती भगवान आहेर आणि दिलीप कुंटे यांच्याही स्वाक्षऱ्या आहेत.

# नागपूर लोहमार्ग पोलिसांकडून 29 गुन्हयात दोषसिद्धी प्राप्त करणाऱ्या अधिकारी, अंमलदार व कोर्ट पैरवींचा गौरव

**दैनिक युवक आधार**
**नागपूर सतीश कडू संपादक विभाग** : दि 08/07/26 रोजी 11.00 वा पोलिस अधीक्षक कार्यालय अजनी येथे नागपूर लोहमार्ग जिल्ह्याची मासिक गुन्हे आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये चोरी, विनयभंग, दुखापत तसेच दारूबंदी कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धी प्राप्त करून उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या 24 तपासी अधिकारी, अंमलदार आणि कोर्ट पैरवी यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला.नागपूर लोहमार्ग जिल्ह्यांतर्गत गोंदिया, इतवारी, नागपूर, वर्धा, बडनेरा आणि अकोला ही 6 महत्त्वाची रेल्वे पोलीस ठाणी कार्यरत असून या पोलीस ठाण्यांमध्ये दररोज विविध प्रकारचे गुन्हे दाखल होत असतात. या गुन्ह्यांचा न्यायालयामध्ये नियमितपणे निकाल लागत असतो. दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यामध्ये तपासी अधिकारी, अंमलदार तसेच कोर्ट पैरवी यांचा अत्यंत मोलाचा वाटा असतो. यावेळी मा पोलीस अधीक्षक श्री. मंगेश शिंदे यांनी उपस्थितांना संबोधित करताना




सांगितले की, सन 2026 मध्ये नागपूर लोहमार्ग जिल्ह्याचे दोषसिद्धीचे प्रमाण 60 टक्के असून, हे चालू वर्षातील रेल्वे पोलीस दलातील सर्वाधिक दोषसिद्धीचे प्रमाण आहे. ही कामगिरी सर्व तपासी अधिकारी, अंमलदार व कोर्ट पैरवी यांच्या समन्वय, परिश्रम आणि प्रभावी न्यायालयीन पाठपुराव्याचे फलित असल्याचे त्यांनी नमूद केले. गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याचा पुढील तपास, पुरावे संकलन, न्यायालयीन प्रक्रिया आणि अखेरीस दोषसिद्धी होण्यासाठी होणारे परिश्रम सामान्य नागरिकांना अनेकदा माहीत नसतात. या सत्कार समारंभामध्ये एकूण 35 अधिकारी, अंमलदार व कोर्ट पैरवी यांचा गौरव करण्यात आल्याने त्यांना भविष्यात अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाल्याची भावना त्यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केली.

सदर सत्कार कार्यक्रम मा पोलीस अधीक्षक श्री.मंगेश शिंदे यांच्या मार्गदर्शनात अपर पोलीस अधीक्षक डॉ. दत्ताराम राठोड, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. पांडुरंग सोनवणे, श्री. रवींद्र शिंदे (गृह) तसेच 6 रेल्वे पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी रेल्वे पोलीस मुख्यालयाचे राखीव पोलीस निरीक्षक श्री. वानखेडे, श्री. रनीत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सत्कार समारंभाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पोलीस निरीक्षक श्री. अमोल दोंड, प्रभारी रेल्वे पोलीस स्टेशन अकोला यांनी केले.

# गद्दारांना प्रतिष्ठा देऊ नका; विश्वासार्हतेला तडा जातो' : शिंदे–पवारांच्या बैठकीवर राऊतांचा घणाघात

**दैनिक युवक आधार**

**मुंबई /प्रतिनिधी** : विधानभवनातील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दालनात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पक्षाची बैठक घेतल्याने राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे. या बैठकीवर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत, "गद्दारांना प्रतिष्ठा देऊ नका; अशा कृतीमुळे पक्षाच्या विश्वासार्हतेला तडा जातो," असा घणाघात केला.

गुरुवारी मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना राऊत म्हणाले की, शरद पवार हे देशातील ज्येष्ठ आणि अनुभवी नेते आहेत. त्यांनी मुख्यमंत्री किंवा अन्य नेत्यांना भेटण्यात काहीही गैर नाही. मात्र, ज्या एकनाथ शिंदे यांनी गद्दारी करून सरकार पाडले, त्यांच्या दालनात जाऊन पक्षाची बैठक घेणे योग्य नाही. अशा कृतीमुळे चुकीचा राजकीय संदेश जातो आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची विश्वासार्हता कमी होते, असे त्यांनी म्हटले.

राऊत यांनी प्रश्न उपस्थित करत म्हटले, "अख्खे विधानभवन रिकामे होते का? समोर राष्ट्रवादी भवन, शिवसेना भवन आणि इतर बैठकीसाठी अनेक जागा उपलब्ध असताना शिंदे यांच्या दालनातच बैठक घेण्याची गरज काय होती? यामुळे महाविकास आघाडीतील कार्यकर्त्यांच्या भावना दुखावल्या आहेत."

ते पुढे म्हणाले, "जर आम्ही अजित पवार यांच्या दालनात जाऊन बैठक घेतली असती, तर आम्ही महाविकास आघाडीच्या विरोधात गेलो, असा अर्थ काढला गेला असता. त्यामुळे महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांनी काही राजकीय संकेत आणि मर्यादा पाळल्या पाहिजेत."

**'आमच्यासारख्या निष्ठावंतांना हे मान्य नाही'**

राऊत म्हणाले, "हे फक्त माझे मत नाही, तर शिवसेनेतील अनेक निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या भावना आहेत. आम्ही इतकेही सहिष्णु नाही. ज्यांचे मन मोठे आहे त्यांनी तसे करावे; पण अशा कृतीमुळे राष्ट्रवादी काँग्रेसची विश्वासार्हता कमी होते."

**सीमाप्रश्नाच्या बैठकीवरही उपस्थित केले सवाल**

शरद पवार हे महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावरील बैठकीसाठी विधानभवनात आले होते. याच संदर्भात राऊत यांनी सरकारवर टीका करत विचारले, "या बैठकीत नेमके काय झाले, हे जनतेसमोर का आले नाही? शिवसेना हा सीमाप्रश्नातील महत्त्वाचा पक्षकार असताना आम्हाला का बोलावले नाही? सर्वोच्च न्यायालयात सरकारचे वकील अनेकदा अनुपस्थित का राहतात? सीमाभागातील मराठी बांधवांच्या प्रश्नांकडे सरकार गांभीर्याने पाहत आहे का?"

**'शरद पवार एनडीएसोबत जाणार नाहीत; पण...'**

राऊत यांनी स्पष्ट केले की, शरद पवार एनडीएसोबत जाणार नाहीत, याबाबत त्यांना शंका नाही. "त्यांच्या विचारधारेवर माझा विश्वास आहे. मात्र, त्यांच्या कालच्या कृतीमुळे शिवसेना अस्वस्थ झाली आहे. या बैठकीची गरज नव्हती. तुम्ही महाराष्ट्राला काय संदेश देत आहात? ज्यांना तुम्ही गद्दार म्हणता, त्यांनाच प्रतिष्ठा देत असाल, तर मग गद्दारीविरोधात लढण्याचा नैतिक अधिकार उरत नाही," असा टोला त्यांनी लगावला.

**'ही गोष्ट आमच्या मनाला लागली'**

राऊत म्हणाले, "एकनाथ शिंदे हे यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण, वसंतदादा पाटील, वसंतराव नाईक किंवा विलासराव देशमुख यांच्यासारखे नेते नाहीत की त्यांच्या दालनात जाऊन बैठक घ्यावी. ही गोष्ट आमच्या मनाला लागली आहे."

शिंदे यांच्या दालनात झालेल्या शरद पवारांच्या बैठकीनंतर महाविकास आघाडीतील समन्वय आणि राजकीय संदेशावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संजय राऊत यांच्या या वक्तव्यामुळे राज्याच्या राजकारणात नव्या वादाला तोंड फुटले आहे.

# सिल्लोडच्या बहुलीतील 'शतायुषी करवंद जाळी' ठरली तालुक्याचा हरित वारसा

## चार पिढ्यांची साक्षीदार: दरवर्षी मिळते ३५ किलो उत्पादन

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : 'मंगल देशा! पवित्र देशा! अंजन, कांचन, करवंदीच्या काटेरी देशा' या महाराष्ट्र गीतातील ओळींना सार्थ ठरवणारी एक महत्त्वाची घटना सिल्लोड तालुक्यात घडली आहे. तालुक्यातील बहुली येथे खेळणा नदीच्या काठावर विष्णू निकोद यांच्या शेतात १०० वर्षे पुरातन आणि ४ पिढ्यांची साक्षीदार असणारी करवंद जाळी आहे. हे निसर्गवैभव आता तालुक्याचा 'झुडूप वर्गीय हरित वारसा' म्हणून घोषित झाले आहे.

**•जाळीची वैशिष्ट्ये व जतनाचे मर्म•**

हे करवंद झुडूप जमिनीपासून ३५ फूट उंच असून, पूर्व-पश्चिम २२ फूट आणि उत्तर-दक्षिण २० फूट परिसरात पसरलेले आहे. या शतायुषी जाळीच्या जतनाचे मर्म म्हणजे, तिथे १०० वर्षांपासून असणारा शेणखताचा उकिरडा, त्यातून मिळणारे सेंद्रिय अन्नघटक, निकोद यांच्या घरातून निघणारे सांडपाणी, खेळणा नदी, टेकडीकडून येणारा नाला आणि हे झुडूप एका १०० वर्ष जुन्या 'मोई' वृक्षाच्या आधाराने टिकून राहणे हे आहे. निकोद परिवार घरातील सदस्याप्रमाणे याची काळजी घेतात.



'हा हरित वारसा सिल्लोडच नव्हे तर महाराष्ट्राचे वैभव आहे. हा झुडूप वर्गीय राज्य वारसा व्हावा म्हणून आमचा विभाग नेहमीच सहयोग देईल. या तालुक्यात अनेक ऐतिहासिक गोष्टी आहेत, त्यांचे जतन करण्यास प्राधान्य राहील. निकोद परिवार, डॉ. संतोष पाटील व बहुलीकरांचे कार्य कौतुकास्पद आहे.'

- रत्नाकर पगार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड.

**•शास्त्रोक्त अभ्यास व अधिकृत घोषणा•**

अभिनव प्रतिष्ठानचे डॉ. संतोष पाटील यांनी पाच वर्षांपासून या वृक्षवैभवाचे अध्ययन करून शास्त्रोक्त ड्राफ्ट तयार केला. त्यांनी सोयगाव-सिल्लोड व अजिंठा प्रादेशिक वनविभाग, पंचायत समिती, तहसील विभाग, ग्रामपंचायत बहुली यांच्या समन्वयातून आणि ५०० हून अधिक पर्यावरण संवर्धक हरित सेवक व नागरिकांच्या स्वाक्षरी मोहिमेद्वारे शासनाची अनुमती मिळवली. आज पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांच्या हस्ते, वनविभागाचे गणेश परदेशी, पूजा राजपूत, साहाय्यक गटविकास अधिकारी आशिष म्हस्के व बहुलीचे ग्रामसेवक विनोद गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत या वारसा वृक्षाच्या माहिती फलकाचे (फ्रेम) विमोचन करण्यात आले.

**जैवविविधतेत करवंदनीय योगदान**

या जाळीमुळे परिसरात लालबुड्या बुलबुल, तांबट, कस्तुर, सूर्यपक्षी-शिंजीर, सातभाई, कोकीळ, फुलटोच्या, तितर, पोपट, लाहोरी अशा ११ प्रजातींचे पक्षी, तसेच माकडे, खार व वटवाघूळ या वन्यजीवांचे वास्तव्य आहे. फुलांचा मकरंद प्राशन करण्यास असंख्य मधमाशा, फुलपाखरे, भुंगे, कीटक, मुंग्या उन्हाळ्यात येथे गर्दी करतात. 'कॉमन क्रो', 'कॉमन सिल्व्हर लाईन', 'लाँग बँडेड सिल्व्हर लाईन' या प्रजातींच्या फुलपाखरांसाठी हा 'होस्ट प्लांट' ठरला आहे.

# मतदार यादीत नाव टिकवण्यासाठी 'एसआयआर' नोंदणी बंधनकारक

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी : गिरमाजी सूर्यकार** : सरकारच्या निवडणूक आयोगाकडून एसआयआर (विशेष सखोल पुनरीक्षण) नोंदणी चालू आहे. आता १००% लोकांनी नाव नोंदणी केली नाही तर पुढील ५ वर्ष पुन्हा मतदान यादीत नाव टाकता येणार नाही, त्यासाठी प्रत्येक वार्डोवार्डात आपल्या बीएलओला भेटून एसआयआर पूर्ण करून घेणे महत्त्वाचे आहे. जे एसआयआर करणार नाहीत त्यांची नावे उडतील, त्यांना कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ मिळणार नाही. टप्प्याटप्प्याने अडचणी निर्माण होतील आणि मग एसआयआर न केल्याचा पश्चाताप होईल. सध्या या प्रक्रियेला अत्यंत अल्प प्रतिसाद नागरिकांकडून मिळत आहे, ही चिंताजनक बाब आहे. आमचे ५० वर्षांपासून नाव आहे, तीन-चार पिढ्यांपासून मतदान केले आहे, आमचे नाव उडत असते का? अशा अभावात राहू नका, योग्य कागदपत्रे देऊन नोंदणी करणे क्रमप्राप्त आहे. नाही तर नाव उडेल आणि पुन्हा पश्चातापाची पाळी येईल.




आपले फोटो आणि आधार कार्डच्या झेरॉक्स काढून देण्यासाठी प्रत्येक वार्डातील नगर सेवकांनी कॅम्प लावून त्या ठिकाणी या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. जेणेकरून एसआयआरची प्रक्रिया अधिक गतीने आणि लवकरात लवकर पूर्ण होईल. असे जनतेतून मागणी होत आहे

**यापुढे निवडणूक कार्डच नागरिकत्वाचा पुरावा**

एसआयआर प्रक्रियेला अत्यंत महत्त्व आहे. निवडणूक कार्डच नागरिकत्वाचा कायदेशीर पुरावा आहे हे न्यायालयाने सिद्ध केले आहे. आधार कार्ड हा नागरिकत्वाचा पुरावा नाही असा निवाडा न्यायालयाने दिलेला आहे. त्यामुळे इतर कोणतेही पुरावे नागरिकत्वासाठी ग्राह्य धरले जाणार नाहीत, कोर्टाने पासपोर्टलाही नागरिकत्वाचा कायदेशीर पुरावा मानले नाही. येत्या काळात ज्यांच्या जवळ निवडणूक कार्ड असेल तोच खरा नागरिक म्हणून गणला जाईल याची नोंद प्रत्येक नागरिकाने घेणे आवश्यक आहे.

**आता कंटाळा केला तर पुन्हा डोक्यावर हात मारून घेण्याची वेळ**

एसआयआर प्रक्रिया ही अत्यंत महत्त्वाची आणि सर्वांसाठी बंधनकारक आहे. आता जर आपण नाव नोंदणी केली नाही तर यापुढे आपल्या शैक्षणिक तसेच इतर सर्व कामकाजासाठी वेळोवेळी अडचणी निर्माण होणार आहे. आधार कार्डला आता किंमत नाही, भविष्यात निवडणूक कार्ड हाच कायदेशीर पुरावा गणला जाणार आहे. त्यामुळे टाळाटाळ करणे, पुन्हा करू, बघू, काही होत नसते असा विचार करणे सोडून द्या, तात्काळ आपल्या बीएलओशी संपर्क करून एसआयआर नोंदणी करून घ्या नसता पश्चातापाची वेळ येईल.

**नागरिकांनो आळस सोडा! वेळीच करा 'एसआयआर' नोंदणी करा, नाहीतर येईल पश्चातापाची वेळ!**

# खांद्याला खांदा देणाऱ्या निष्ठावंत सहकाऱ्याला संधी व्हा.चेअरमनपदी शिवाजीराव निंबाळकर

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या व्हाइस चेअरमनपदी संचालक श्री शिवाजीराव (दादा) रामराव निंबाळकर यांची निवड करण्यात आली माजी व्हाइस चेअरमन कैलास गावडे यांनी राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या पदासाठी ही निवड संचालक मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते करण्यात आली. कारखान्याचे चेअरमन मा.पृथ्वीराज (बापू) जाचक यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याच्या प्रगतीसाठी सातत्याने खांद्याला खांदा लावून काम करणारे,संघटनेशी एकनिष्ठ राहून जबाबदारी पार पाडणारे नेतृत्व म्हणून शिवाजीराव (दादा) निंबाळकर यांच्याकडे पाहिले जाते.त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांच्यावर व्हाइस चेअरमनपदाची जबाबदारी सोपविण्यात आल्याची चर्चा कारखान्याच्या सभासदांमध्ये रंगली आहे.




या निवडीमुळे सणसर परिसरासह गावातील युवकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून,अनेकांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.कारखान्याच्या विकासाला अधिक गती मिळेल,अशी अपेक्षा सभासदांनी व्यक्त केली.कारखान्याच्या सभागृहात झालेल्या बैठकीत संचालक मंडळाच्या उपस्थितीत ही निवड प्रक्रिया पार पडली.यावेळी संचालक अधिकारी तसेच कामगार वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# अपर तहसील केनवड ऐवजी गोवर्धनला द्या – गजानन वाघ

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रिसोड. रणजितसिह. ठाकूर** : शासकीय सेवा सर्व नागरिकांना वेळेत आणि लवकर मिळाव्यात यासाठी महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने काही तालुक्यांमध्ये अप्पर तहसील ची निवड करण्याचे पत्रक काढलेले आहे रिसोड तालुक्यांमध्ये तहसील अंतर्गत केनवड आणि गोवर्धन या दोन मंडळा मिळून अपर तहसील ची केनवड येथे मुख्यालयासाठी निवड झाली आहे परंतु गोवर्धन हे भौगोलिक दृष्ट्या दोन्ही मंडळासाठी सोयीचा असल्याने भौगोलिक ऐतिहासिक शैक्षणिक प्रशासकीय लोकसंख्येया व भौगोलिक दृष्ट्या बुलढाणा जिल्ह्याच्या सीमेवर असून प्रस्तावित अपर तहसील क्षेत्राच्या एका टोकाशी आहे गोवर्धन अपर तहसील झाल्यास



चिंचाबापेन गोवर्धन मंडळातील केशवनगर चे अंतर अंदाजे 30 किलोमीटर ते 35 किलोमीटर पर्यंत येणार त्यामुळे गोवर्धन मंडळ अपर तहसील हे गोवर्धन व केनवड मंडळ मिळून मुख्यालय गोवर्धन मध्ये घेतल्यास केनवड आणि गोवर्धन मंडळ मधील सर्व गावांसाठी मुख्यालय हे मध्यवर्ती ठिकाणी होऊ शकते

गोवर्धन मंडळातील गावांची एकुण लोक संख्या 20 हजाराच्या आसपास असून मंडळातील केनवड मंडळामधील लोकसंख्या गावची लोकसंख्या 15000 च्या आत आहे


गोवर्धन मंडळाची लोकसंख्या व गावाची संख्या अधिक आहे व हे ठिकाण भौगोलिक दृष्ट्या मध्यवर्ती ठिकाणची आहे तसेच ऐतिहासिक सामाजिक राजकीय महत्त्व गोवर्धनला जुन्या काळात फार मोठे महत्त्व आहे एकेकाळी गोवर्धन हे विधानसभेचा मतदार संघ संघ होता तसेच गोवर्धन हे इंग्रज काळापासून महसूल मंडळाचे ठिकाण आहे या गावात आज रोजी आपर तहसील कार्यालय व इमारत भाडेतत्त्वावर मिळू शकते भविष्यात इमारत बांधकामासाठी गावांमध्ये जवळपास 300 एकर शासकीय लँड उपलब्ध आहे

त्यामुळे येथे कार्यालय उभारणीसाठी सोयीचे व कमी अंतराचे ठरते या सर्व बाबीचा विचार करून प्रशासनाने मध्यवर्ती ठिकाण कार्यालय असलेल्या नागरिकांना महसूल जमीन अभिलेखन प्रमाणपत्रे आपत्ती व्यवस्थापन तसेच इतर शासकीय चा लाभ अधिक सुलभसूत्रपणे मिळू शकते त्यामुळे केनवड येथील प्रस्तावित अपर तहसील कार्यालयास हरकत नोंदवण्यासाठी गोवर्धन मंडळातील बऱ्याच गावातील ग्रामपंचायती व नागरिकांनी एक चळवळ उभारली असल्याचे मत गोर्धन येथील माजी सरपंच गजाननराव वाघ तथा जिल्हाध्यक्ष डॉक्टर विठ्ठलराव विखे पाटील कृषी परिषद वाशिम यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे

# मयूरेश पाटीलचा मृतदेह सापडला

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : गेल्या दोन दिवसांपूर्वी पाण्याच्या प्रवाहात वाहून गेलेल्या कळंबोलीतील मयूरेश पाटीलचा मृतदेह शिरवली स्मशानभूमीच्या जवळील नदीत सापडला. त्याचा मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी रुग्णालयात पाठविण्यात आला.सात जुलै रोजी मयूरेश पाटील यांच्यासह पाच ते सहा मित्र पनवेल तालुक्यातील मोरबे ते बदलापूर बोगदा जवळील भेकरेवाडी, शिरवली गाव परिसरात फिरण्यासाठी गेले होते. ते पाण्यात पोहण्यासाठी उतरले असता मयूरेश पाटील याचा पाय घसरला आणि पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. पनवेल तालुका पोलिसांना या प्रकाराची माहिती दिल्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. यावेळी



सलग तीन दिवस त्याचा पाण्याच्या प्रवाहात अग्निशामक दल, एनडीआरएफची टीम, पनवेल तालुका पोलीस ठाणे ग्रामस्थ व मित्रांनी शोध घेण्याचा प्रयत्न केला मात्र तो सापडून येत नव्हता. अखेर आज नऊ जुलै रोजी राबवलेल्या शोध मोहिमेत दुपारच्या सुमारास शिरवली गाव स्मशानभूमी जवळील नदीत त्याचा मृतदेह सापडून आला. मुसळधार पाऊस कोसळत असल्याने नदी, ओढे, तलाव परिसरात नागरिकांनी पाण्यात उतरू नये आणि आपला जीव धोक्यात घालू नये असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

**जाहिर प्रकटन**

**हरवले आहे**

राम कुंडलिक ढाकणे, मु, राळेसांगवी ता. शिरूर कासार जी बीड. यांचा१० वी आणि १२ वीचा दाखला, (टी.सी.) त्याच बरोबर १० वी १२ वी चे मार्कशिट व सनद हे ओरिजनल कागदपत्रेआणि इतर सर्व त्यांच्या झेरॉक्स कॉपी ही कागदपत्रे २६ जुलै २०२५ रोजी मुंबई ते शिरूर कासार या , प्रवासा दरम्यान गहाळ झाली आहेत. आढळल्यास संपर्क करावा

संपर्क पत्ता: राम कुंडलिक ढाकणे. राहणार: राळेसांगवी , तालुका शिरूर कासार जिल्हा बीड.

मोबाईल क्रमांक: ८१६९९८२४२४/९७६६७६६२२९

सिद्धी प्रिंटर्स

दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.

वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये डीटीपी करून मिळेल

Call 9028240020 ,9220403509

# 'सार्वजनिक बांधकाम' की 'नागरिकांच्या मृत्यूचे' खाते?

## वेलवली–खानाव पुलावरील 'ते' भगदाड ठरले शासकीय हलगर्जीपणाचे स्मारक!

**दैनिक युवक आधार**

**अलिबाग निलेश फुंडे रेवदंडा प्रतिनिधी** : शासकीय यंत्रणेचा ढिम्म कारभार, कंत्राटदारांचे निकृष्ट दर्जाचे काम आणि 'लाचखाऊ' वृत्तीचा आणखी एक बळी अलिबाग-रोहा रस्त्यावर गेला आहे. वेलवली-खानाव पुलावर पडलेल्या एका अवाढव्य आणि भयानक भगदाडात (खड्ड्यात) पडून चांगू कमळू घरत (वय ५५) या निष्पाप पादचाऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. विशेष म्हणजे, मुसळधार पावसामुळे रस्त्याच्या मधोमध हे मृत्यूचे कोडे तयार झाले होते, मात्र त्यावर एक साधा बॅरिकेड लावण्याचे किंवा सुरक्षेचा फलक उभा करण्याचे सौजन्यही सार्वजनिक बांधकाम विभागाने (पी.डब्ल्यू.डी) दाखवले नाही. प्रशासनाच्या याच गुन्हेगारी स्वरूपाच्या निष्काळजीपणामुळे एका गरिबाचा नाहक बळी गेला असून, यामुळे संपूर्ण रायगड जिल्ह्यात संतापाची तीव्र लाट उसळली आहे.वर्षही न भरता भ्रष्टाचाराचे थर उघडे!अलिबाग ते रोहा या अत्यंत महत्त्वाच्या आणि वर्दळीच्या मार्गावरील खानाव पुलाचे काम अवघ्या काही महिन्यांपूर्वीच पूर्ण करण्यात आले होते. मात्र पहिल्याच मोठ्या पावसात या कामाचा दर्जा वाहून गेला आणि रस्त्याला नदीचे स्वरूप आले. पुलाला पडलेले हे भगदाड कंत्राटदाराच्या निकृष्ट कामाची आणि भ्रष्टाचाराची उघड साक्ष देत आहे. केवळ सरकारी तिजोरी लुटून स्वतःचे खिसे भरणारे कंत्राटदार आणि त्यांना अभय देणारे पीडब्ल्यूडी चे अधिकारी आता जनतेच्या रक्ताने माखले आहेत, अशी उद्विग्न प्रतिक्रिया स्थानिक ग्रामस्थांमधून येत आहे.आधीच दिली होती चेतावणी; पण प्रशासन गाढ झोपेत!या रस्त्यावरील जीवघेण्या दुरवस्थेबाबत आणि पुलाच्या बिकट तांत्रिक स्थितीबाबत



सामाजिक कार्यकर्त्यांनी व स्थानिक ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, जिल्हाधिकारी आणि पोलीस प्रशासनाला आधीच लेखी निवेदने देऊन अवगत केले होते. "प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अन्यथा मोठा अनर्थ घडेल" अशी थेट चेतावणी दिलेली असतानाही, प्रशासनाने नेहमीप्रमाणे फाईलींवर कागदी घोडे नाचवण्यात धन्यता मानली. जर वेळीच उपाययोजना करून तिथे बॅरिकेडिंग किंवा धोक्याची सूचना लावली असती, तर आज चांगू घरत हे आपल्या कुटुंबात जिवंत असते.

**१५ लाखांची मलमपट्टी; पण न्यायाचे काय?**दुर्घटना घडल्यानंतर नेहमीप्रमाणे संतप्त ग्रामस्थांनी आणि शेकापच्या चित्रलेखा पाटील यांच्यासह स्थानिक नेत्यांनी घटनास्थळी आक्रमक पवित्रा घेतला.

जोपर्यंत अधिकारी येत नाहीत, तोपर्यंत मृतदेह न उचलण्याचा पवित्रा घेतल्यानंतर अखेर सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता दिनेश पराते यांनी मृतकाच्या नातेवाईकांना १५ लाख रुपयांची मदत देण्याचे आश्वासन दिले. मात्र, "मदत देऊन प्रशासन आपले हात झटकू शकत नाही. गेलेला जीव पैशाने परत येणार आहे का?" असा रोखठोक सवाल ग्रामस्थ विचारत आहेत.

### अवघ्या काही महिन्यांपूर्वी झालेल्या कोट्यवधींच्या रस्त्याला भगदाड; निष्पाप पादचाऱ्याच्या बळीनंतर अलिबागकरांचा संताप, दोषींवर सदोष मनुष्यवधाच्या गुन्ह्याची मागणी

> 'वेलवली-खानाव पुलावरील दुर्घटना हा निव्वळ अपघात नसून, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि भ्रष्ट कंत्राटदारांच्या युतीने केलेला हा 'सरकारी खून' आहे. नवीनच तयार केलेल्या रस्त्यावर पहिल्याच पावसात एवढा मोठा खड्डा पडतो, यावरून कामातील भ्रष्टाचाराची पातळी स्पष्ट होते. दुर्घटनेनंतर आम्ही तात्काळ कुटुंबाला १५ लाख रुपयांची मदत मिळवून दिली आहे, पण आमचा लढा इथेच संपत नाही. केवळ पैशांची मलमपट्टी करून चालणार नाही; जोपर्यंत या निकृष्ट कामाला जबाबदार असणारे कंत्राटदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दोषी अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल होऊन त्यांना तुरुंगात धाडले जात नाही, तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही!'
>
> — चित्रलेखा पाटील (नेत्या, शेतकरी कामगार पक्ष)

**शासनाचे कान टोचणारे सवाल**

पैसा कोणाच्या बापाचा? – जनतेच्या करातून उभारलेला कोट्यवधी रुपयांचा निधी निकृष्ट कामांवर फुंकणाऱ्या कंत्राटदाराला पाठीशी घालणारे अधिकारी कोण?मनुष्यवधाचा गुन्हा कधी? – ही केवळ 'अपघाती मृत्यू'ची घटना नसून, प्रशासनाने केलेला हा 'सरकारी खून' आहे.

मग संबंधित कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा (आयपीएस 304) गुन्हा का दाखल होत नाही?काळ्या यादीत कधी टाकणार?–नागरिकांच्या जीवांशी खेळणाऱ्या या कंत्राटदाराला ब्लॅकलिस्ट करून त्याचे परवाने कायमचे रद्द करण्याचे धाडस सरकार दाखवणार का?

"भ्रष्ट कंत्राटदार आणि सुस्त अधिकाऱ्यांमुळेच हा निष्पाप बळी!"

---

# आदिशक्ती संत मुक्ताई पालखी मार्गावरील अस्वच्छता व खड्डे तातडीने दुरुस्त करा!

### मुख्याधिकारी नगर परिषद व जिल्हाधिकाऱ्यांकडे डॉ.गणेश ढवळे यांची निवेदनाद्वारे मागणी

**दैनिक युवक आधार**

**शेख महेशर ताहेर, पाटोदा (प्रतिनिधी)** - आदिशक्ती संत मुक्ताईंची पालखी बीड शहरात दाखल होत असून, पालखी मार्गावरील अस्वच्छता, कचऱ्याचे ढीग आणि ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे वारकरी व भाविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे पालखी मार्गाची तातडीने स्वच्छता करून रस्त्यांवरील खड्डे बुजवावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते



डॉ.गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद बीड आणि जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. आदिशक्ती संत मुक्ताईंची पालखी जालना रोडमार्गे बीड शहरात प्रवेश करते. त्या नंतर सुभाष रोड, माळवेस, धोंडीपुरा, बलभीम चौक आणि जुना बाजार मार्गे पुढील प्रवास करते. बीड मध्ये संत मुक्ताई आणि आजोबा गोविंदपंत यांची भेट होत असल्याने या पालखी सोहळ्याला विशेष धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व आहे. पालखीचा दोन दिवसांचा

> डॉ.ढवळे यांची मागणी पालखी आगमनापूर्वी संपूर्ण मार्गाची विशेष स्वच्छता मोहीम राबवून रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजवावेत, प्रकाशव्यवस्था आणि इतर आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून वारकरी व भाविकांना सुरक्षित आणि सुलभ दर्शनाची व्यवस्था करावी, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी प्रशासनाकडे केली आहे.

> पालखीचा प्रमुख मार्ग जालना रोड सुभाष रोड माळवेस धोंडीपुरा बलभीम चौक जुना बाजार मार्गे आदिशक्ती संत मुक्ताई पालखी पुढील प्रवास करते. याच मार्गावर सध्या मोठ्या प्रमाणात कचरा व रस्त्यांवरील खड्ड्यांची समस्या असल्याचे निदर्शनास आले आहे.

मुक्काम बीडमध्ये असतो. मात्र यंदा पालखी मार्गावर अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले असून रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले आहेत. पालखीच्या दर्शनासाठी हजारो वारकरी आणि भाविक शहरात येत असल्याने या परिस्थितीमुळे अपघाताचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्या मुळे पालखी आगमनापूर्वी संपूर्ण मार्गाची स्वच्छता, खड्ड्यांची दुरुस्ती आणि आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

---

# विष्णुपुरी येथील उड्डाणपुलाच्याम सपोर्ट भिंतीचा भाग कोसळला

### दोन विद्यार्थिनी जखमी, चौकशीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी. विश्वदीप कांबळे** : राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 361 वरील विष्णुपुरी परिसरातील ईजीएस (EGS) महाविद्यालया जवळील उड्डाणपुलाच्या सपोर्ट भिंतीचा काही भाग अचानक कोसळल्याने दोन विद्यार्थिनी जखमी झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधित बांधकामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.




मागील दोन वर्षांपासून सुरू असलेल्या महामार्गाच्या कामांत अनेक उड्डाणपूल उभारण्यात आले आहेत. विष्णुपुरी येथील हा उड्डाणपूल काही महिन्यांपूर्वी पूर्ण झाला होता. मात्र, सपोर्ट भिंतीचा भाग कोसळल्याने बांधकामाच्या दर्जाबाबत शंका व्यक्त होत आहे.

या प्रकरणात नेमकी चूक कुठे झाली, बांधकामाचा दर्जा योग्य होता का, तांत्रिक त्रुटी किंवा पावसामुळे माती खचल्याने ही दुर्घटना घडली का, याची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्या संबंधित अधिकारी, कंत्राटदार किंवा जबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे

---

# हुडकेश्वर पोलिसांची तत्पर कारवाई

## बेपत्ता 11 वर्षीय मुलीचा अल्पावधीत सुखरूप शोध

**दैनिक युवक आधार**

**नागपूर सतीश कडू संपादक विभाग** : दि. 08/07/2026 रोजी पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील एका शैक्षणिक संस्थेच्या वसतिगृहातून 11 वर्षीय मुलगी कोणालाही न सांगता निघून गेल्याची माहिती प्राप्त होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनामिका मिर्झापूरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे हुडकेश्वरच्या पथकाने तात्काळ शोधमोहीम हाती घेतली.

प्राथमिक चौकशीत संबंधित मुलगी वसतिगृहात नव्याने दाखल झाली होती. वसतिगृहात राहण्याची इच्छा नसल्याने ती कोणालाही न सांगता तेथून निघून गेल्याचे निष्पन्न झाले. मुलीकडे मोबाईल अथवा संपर्काचे कोणतेही साधन नसल्याने तिचा शोध घेणे आव्हानात्मक होते.

माहिती मिळताच पोलीस ठाणे हुडकेश्वरच्या अधिकारी व अंमलदारांनी वेळ न दवडता शोधकार्य सुरू केले. मुलगी कोणत्या दिशेने जाऊ शकते, कोणत्या मार्गाचा वापर करण्याची शक्यता आहे, याचा अभ्यास करून विविध रस्ते, चौक, सार्वजनिक ठिकाणे व संभाव्य परिसरात कसून शोध घेण्यात आला.

या शोधमोहीमेत बीट मार्शल पथक तसेच बेपत्ता व्यक्ती प्रकरणाचा कारभार पाहणारे हेड कॉन्स्टेबल दीपक मोरे यांनी अत्यंत तत्परता, चिकाटी व कौशल्याने काम करून अल्पावधीत संबंधित मुलीचा सुखरूप शोध लावला. त्यानंतर मुलीला सुरक्षित ताब्यात घेऊन तिच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले.

हुडकेश्वर पोलिसांच्या तातडीच्या प्रतिसादामुळे व प्रभावी शोधमोहीमेमुळे बेपत्ता अल्पवयीन मुलीचा अल्पावधीत सुखरूप शोध लागला असून, या कार्याबद्दल संबंधितांनी पोलीस ठाणे हुडकेश्वरचे आभार व्यक्त केले आहेत.

---

# चिलगव्हाण येथील प्राणघातक हल्ला प्रकरणी महागाव पोलिसांची धडक कारवाई; १ तासात ३ आरोपी जेरबंद

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी : एम. डी. सुरोशे**

**महागाव** : महागाव तालुक्यातील चिलगव्हाण येथे एका युवकावर जीवघेणा हल्ला केल्याप्रकरणी महागाव पोलिसांनी अतिशय तत्परता दाखवत अवघ्या एका तासाच्या आत तीन आरोपींना अटक करून धडक कारवाई केली आहे. या कारवाईमुळे परिसरात पोलिसांच्या कार्यक्षमतेची चर्चा सुरू आहे.

महागाव पोलीस ठाण्यात ८ जुलै २०२६ रोजी सौ. शीतल राहुल खंदारे (वय २२, रा. चिलगव्हाण) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दोन वर्षांपूर्वी गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान नाचण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून आरोपी अजय बाबाराव



सुपले, अक्षय आत्माराम राऊळ, वैभव पंडित रावते आणि श्रीधर पंडित रावते यांनी राहुल खंदारे व त्यांच्या कुटुंबाविषयी मनात वैर धरले होते.

फिर्यादीनुसार, ६ जुलै २०२६ रोजी रात्री सुमारे ८.१५ वाजता वैभव रावते हा राहुल खंदारे यांना "काम आहे" असे सांगून घराबाहेर घेऊन गेला. त्यानंतर रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास गावात "राहुलला मारले" अशी आरडाओरड सुरू झाली. घटनास्थळी धाव घेतली असता राहुल खंदारे हे वैभव रावते यांच्या घरासमोर गंभीर जखमी अवस्थेत रक्ताच्या थारोळ्यात पडलेले आढळून आले. त्यांच्या डोक्यावर, पाठीवर, खांद्यावर व कानाजवळ गंभीर जखमा झाल्या होत्या. त्यांना तातडीने उपचारासाठी प्रथम पुसद आणि नंतर यवतमाळ येथे हलविण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी महागाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३७२/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमे तसेच अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हा दाखल होताच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांनी चार स्वतंत्र पथके तयार करून आरोपींचा शोध सुरू केला. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी अवघ्या एका तासात तीन आरोपींना ताब्यात घेतले असून चौथ्या आरोपीचा शोध सुरू आहे.

ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांच्या नेतृत्वात सपोनि. सुनिल अंबुरे, सपोनि. प्रसेनजीत जाधव, सपोनि. सरस्वती राठोड तसेच महागाव पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे पार पाडली.

---

# यवतमाळ येथील प्रभाग क्र. २७ मधील विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (SIR) मोहिमेत प्रत्येक मतदारापर्यंत गणना प्रपत्र पोहोचविण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी - जितेंद्र खोडे** : दि. ८ जुलै २०२६ रोजी सामाजिक कार्यकर्ते दिनेश हरणे यांनी उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांची भेट घेऊन प्रभाग क्र. २७ मधील विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमेअंतर्गत प्रत्येक पात्र मतदाराच्या घरी जाऊन गणना प्रपत्र उपलब्ध करून देण्यात यावे तसेच फॉर्म भरण्याबाबत योग्य मार्गदर्शन करण्यात यावे, या मागणीचे निवेदन सादर केले.निवेदनात असे नमूद करण्यात आले की, प्रभागातील




अनेक मतदारांपर्यंत अद्याप गणना प्रपत्र पोहोचलेले नाही.काही घरांमध्ये काही सदस्यांना फॉर्म मिळाले असून इतर पात्र मतदारांना फॉर्म देण्यात आलेले नाहीत.

### उपजिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडून तात्काळ कार्यवाहीचे निर्देश

तसेच अनेक मतदारांना फॉर्म कसा भरायचा याबाबत कोणतेही मार्गदर्शन मिळालेले नसल्याने पात्र मतदार मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याशिवाय,काही नागरिकांकडून अशीही माहिती प्राप्त झाली आहे की काही ठिकाणी बीएलओकडून घरोघरी जाऊन गणना प्रपत्र वाटप करण्याऐवजी एका ठिकाणी बसून किंवा इतर व्यक्तींच्या माध्यमातून फॉर्मचे वितरण करण्यात येत असल्याची शक्यता समोर आली आहे. या माहितीची संबंधित प्रशासनामार्फत वस्तुनिष्ठ चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी,अशीही मागणी निवेदनात करण्यात आली. सदर निवेदनाची दखल घेत उपजिल्हा निवडणूक अधिकारी मा. अविनाश शिंगटे यांनी तात्काळ कार्यवाही करत उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी यांना पत्राद्वारे आवश्यक निर्देश दिले.प्रभाग क्र. २७ मधील विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमेअंतर्गत संबंधित बीएलओ प्रत्येक पात्र मतदाराच्या घरी जाऊन गणना प्रपत्र उपलब्ध करून देत आहेत की नाही,याची चौकशी करावी तसेच प्रत्येक पात्र मतदाराचे नाव मतदार यादीत समाविष्ट होईल आणि कोणताही पात्र मतदार मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहणार नाही,यासाठी आवश्यक ती जबाबदारी निश्चित करून सहकार्य करावे,असे निर्देश देण्यात आले आहेत.लोकशाही प्रक्रियेत प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार अबाधित राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येक घरापर्यंत गणना प्रपत्र पोहोचविणे, मतदारांना फॉर्म भरण्याबाबत योग्य मार्गदर्शन करणे आणि कोणताही पात्र मतदार वंचित राहणार नाही याची खात्री करणे,ही प्रशासनाची जबाबदारी असून संबंधित यंत्रणेने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## 21 लाख 5 हजारांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** गुंतवणुकीवर पाच टक्के नफा देण्याचे आमिष दाखवून 21 लाख 5 हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञाता विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात सात जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.माणिक रेड्डी मालीपाटील हे सेक्टर सात, कामोठे येथे राहत असून 15 मे ते 26 जून दरम्यान अज्ञात इसमाने त्यांना व्हाट्सअप ग्रुपला जॉईन केले आणि गुंतवणुकीवर दररोज 5% नफा देण्याचे आमिष दाखवले आणि त्यांना एक लिंक पाठवली व त्यावर ट्रेंडिंग खाते उघडून वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये टप्प्याटप्प्याने एकूण 21 लाख 5 हजार रुपये रक्कम घेतली आणि ती रक्कम परत न करता त्यांची ऑनलाइन फसवणूक केली.

## मतिमंद तरुणीवर अत्याचार, मुलीला दिला जन्म

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** मतिमंद तरुणीवर अत्याचार करून नऊ महिन्यानंतर तिने एका मुलीला जन्म दिला. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात सात जुलै रोजी अज्ञात इसमाविरोधात गुन्हा दाखल केला. 25 जून रोजी अविवाहित गरोदर स्त्रीचा सांभाळ करण्यासाठी नातेवाईक नसल्याने पीडित महिलेचे वडील आणि बहीण यांनी पीडित महिलेला त्यांच्या नातेवाईकांकडे ठेवले होते. तिच्यावर उपचार सुरू होते. या तरुणीवर उपचार करणारे वैद्यकीय अधिकारी यांनी तिची मानसशास्त्रज्ञाने तपासणी केली. यावेळी पीडित महिला ही मतिमंद दिसून आली. या पिडीत महिलेवर ती राहत असलेल्या ठिकाणी तिच्यावर अज्ञात व्यक्तीने लैंगिक अत्याचार केला. यात ती गर्भवती राहिली. नऊ महिने पूर्ण झाल्यानंतर जून महिन्यात तिची प्रसूती झाली आणि तिने एका मुलीला जन्म दिला. अज्ञात व्यक्तीने 2025 मध्ये तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस अधिक तपास करत आहेत.

## महिलेच्या गळयातील सोन्याची चैन आणि लॉकेट खेचून तिघेजण पसार

**दैनिक युवक आधार**


**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पायी चालत जाणाऱ्या महिलेच्या गळयातील सोन्याची चैन आणि सोन्याचे लॉकेट खेचून तिघेजण पसार झाल्याची घटना पनवेल शहरातील आंबेडकर पुतळ्याजवळ घडली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात सात जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. येथील महिला ही सात जुलै रोजी रात्री साडेआठच्या सुमारास आंबेडकर पुतळ्याजवळून रस्त्याने पायी चालत जात असताना रेनकोट घालून आलेल्या तिघा आरोपींनी महिलेच्या गळयातील तीन तोळे वजनाचे सोन्याची चैन आणि सोन्याचे लॉकेट खेचून ते धावत पळून गेले. या प्रकाराची माहिती पोलिसांना दिल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# गडकिल्ल्यांवरील वाढत्या बेशिस्तीला नेमके जबाबदार कोण?

## शासनाच्या निष्काळजीपणामुळे ऐतिहासिक वारसा धोक्यात – दुर्ग अभ्यासक श्री. गणेश रघुवीर

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित :** लोहगड किल्ल्यावर नुकतीच घडलेली दुर्दैवी घटना संपूर्ण महाराष्ट्रासाठी चिंतेचा विषय ठरली आहे. या प्रकरणाची न्यायालयीन प्रक्रिया सुरू असल्याने त्यावर भाष्य करणे योग्य ठरणार नसले, तरी या घटनेनंतर सोशल मीडियावर सुरू झालेला प्रकार अधिक गंभीर असल्याचे मत दुर्ग अभ्यासक व सदस्य स.प्र.हिं. श्री. गणेश रघुवीर यांनी व्यक्त केले आहे.



त्यांच्या मते, एखाद्या घटनेनंतर गडावरील कड्याला संबंधित व्यक्तीचे किंवा घटनेचे नाव देणे, गुगल मॅपवर अनधिकृतपणे नवीन ठिकाणे तयार करणे, त्याचा सोशल मीडियावर प्रचार करणे आणि त्यातून पर्यटकांना आकर्षित करणे हा ऐतिहासिक वारशाचा अवमान आहे. यामुळे गडाचा हजारो वर्षांचा इतिहास मागे पडून एका दुर्दैवी घटनेची ओळख पुढे येत आहे. अशा प्रकारांना तातडीने आळा घालण्यासाठी शासनाने सायबर यंत्रणेद्वारे अशा नोंदी हटवून संबंधितांवर कारवाई करावी.

श्री. रघुवीर यांनी स्पष्टपणे म्हटले की, अशा घटनांसाठी केवळ बेशिस्त पर्यटकच नव्हे, तर शासनाची अपुरी पर्यटन व्यवस्था आणि दुर्लक्षही तितकेच जबाबदार आहे. ऐतिहासिक गडांवर वाढणारी गर्दी, अपुरी सुरक्षा व्यवस्था, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची कमतरता, धोकादायक ठिकाणी संरक्षण रेलिंगचा अभाव, अपुरे सूचना फलक आणि नियंत्रण यंत्रणेतील त्रुटी यामुळे अशा घटना घडत आहेत. त्यामुळे प्रत्येक अपघातानंतर केवळ पर्यटकांवर दोषारोप करण्याऐवजी शासनाने स्वतःच्या जबाबदारीचेही आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे.

लोहगडाच्या ऐतिहासिक आणि भौगोलिक महत्त्वामुळे वर्षभर हजारो पर्यटक येथे भेट देतात. पावसाळ्यात ही संख्या आणखी वाढते. मात्र अनेक पर्यटकांना गडाचा इतिहास, त्याचे महत्त्व किंवा धोकादायक ठिकाणांची माहिती नसते. काही जण केवळ रील्स, व्हिडिओ, सेल्फी, स्टंट, पिकनिक किंवा मद्यपानासाठी गडांवर येतात. त्यामुळे स्वतःचा जीव धोक्यात घालण्याबरोबरच गडकिल्ल्यांची प्रतिमाही मलिन होत आहे.

लोहगड हा केंद्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाच्या संरक्षणाखालील स्मारक असून अलीकडेच जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट झालेल्या मराठा लष्करी वारशाचा भाग आहे. त्यामुळे अशा किल्ल्यांवर जागतिक दर्जाच्या सुविधा आणि सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून देणे ही केंद्र व राज्य शासनाची संयुक्त जबाबदारी आहे.

त्यासाठी प्रवेशद्वारावर कडक तपासणी, कायमस्वरूपी सुरक्षा रक्षक, धोकादायक कड्यांवर नवीन संरक्षक रेलिंग, सीसीटीव्ही, डिजिटल माहिती प्रणाली, ऑनलाइन तिकीट व्यवस्था, अधिकृत गाईड, पावसाळ्यात वन विभाग व स्थानिक प्रशासनाचे विशेष पथक, प्लास्टिक व मद्यबंदीची कठोर अंमलबजावणी आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई अशा उपाययोजना राबविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

तसेच केंद्र व राज्य शासनाकडून गडांच्या जतन-संवर्धनासाठी दरवर्षी दिला जाणारा निधी नेमका कुठे खर्च झाला, कोणती कामे झाली आणि त्याचा लाभ काय झाला याचा सार्वजनिक अहवाल प्रसिद्ध करावा. त्यामुळे निधीचा पारदर्शक वापर होईल आणि संवर्धनाच्या कामांवर लोकनियंत्रणही राहील.


श्री. रघुवीर म्हणाले की, ज्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, गडांचे महत्त्व आणि दुर्गसंस्कृतीची जाण आहे, ते अशा प्रकारचे कृत्य करत नाहीत. मात्र इतिहासाची माहिती नसलेले काही हौशी-नौशी पर्यटक सोशल मीडियावरील प्रसिद्धीसाठी स्वतःचाही जीव धोक्यात घालतात आणि गडांचाही अपमान करतात. ही मानसिकता बदलण्यासाठी इतिहासाबरोबरच शिस्तबद्ध पर्यटन संस्कृती निर्माण करणे आवश्यक आहे.इतिहास, सुरक्षा आणि संवर्धन या तिन्ही बाबींचा समतोल राखून शासनाने तातडीने कठोर धोरण राबविले नाही, तर आज लोहगडावर घडलेले प्रकार उद्या हरिश्चंद्रगड, राजगड, हरिहर, रतनगड आणि इतर गडकिल्ल्यांवरही घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# नेरळ पोलीस ठरले देवदूत!! उल्हास नदीच्या काठावरील फार्महाऊस मधील पर्यटकांची केली सुखरूप सुटका

**दैनिक युवक आधार**

**ता. कर्जत - वैभव गायकवाड :** संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये गेल्या आठवड्याभरापासून मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस बरसत आहे. रायगड जिल्ह्यातील उल्हास नदी ही एक मुख्य नदी मानली जाते. गेल्या अनेक दिवसांपासून उल्हास नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून नदीशेजारील सर्व गावांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यातच बुधवार दिनांक ८ जुलै रोजी शेलू ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या उल्हास नदीच्या जवळ एका फार्म हाऊस मध्ये पर्यटणासाठी आलेले काही पर्यटक अडकून पडले. नदीला पूर असल्यामुळे त्यांना तेथून बाहेर पडणे अशक्य झाले. त्यातच सततच्या पावसामुळे नदीने रौद्र रूप धारण केल्याने पर्यटकांच्या जीवाची भीती निर्माण झाली.

सदर घटना नेरळ पोलीस ठाण्याला समजताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल वरोटे तसेच त्यांचे सहकारी पोलीस उप निरीक्षक भास्कर गच्चे व पोलीस शिपाई अमोल कनके आणि इतर सहकारी यांनी तातडीने धाव घेऊन स्वतःच्या जीवाची पर्वा न करता पूर परिस्थिती असतांना देखील पर्यटकांच्या जीवाची रक्षा करण्यासाठी नदीपात्रात उतरून त्यांना सुखरूप बाहेर काढण्याची तयारी सुरु केली.तब्बल ३ तास अथक प्रयत्नानंतर संपूर्ण नेरळ पोलीस टीम ने पुराच्या वेढ्यात अडकलेल्या



२ पर्यटकांना अगदी सुखरूप वाचवले आणि त्यांची योग्य सोय करून त्यांना मार्गस्थ केले.

वाचविलेल्या पर्यटकांनी नेरळ पोलीस तसेच सर्व टीम बद्दल आपली भावना व्यक्त करतांना "तुम्ही देव बनून आम्हाला वाचविले" असे मनस्वी आभार व्यक्त केले. आपण अनेकदा पोलिसांच्या कामावर टीका करतो कधी कधी त्यांच्यावर प्रश्नचिन्ह उभे करतो, परंतु ज्यावेळेस पोलीस आपल्या जीवाची पर्वा न करता जनतेची सेवा करतात त्यावेळी मात्र त्यांचे कौतुक करणे हेदेखील आपले कर्तव्य असले पाहिजे.'सद्रक्षणाय खलनीग्रहणाय' या पोलिसांच्या ब्रीदवाक्यास साजेसे हे महाराष्ट्र पोलिसांचे कार्य महाराष्ट्राची मान कायम उंचावते. अशा सर्व पोलीस बांधवांचे शतशः आभार.

### अजितदादांना मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करा

## राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभा मुख्य प्रतोद चेतन तुपे यांची मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांना मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभा मुख्य प्रतोद चेतन तुपे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

दरम्यान स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या नावाचा पद्मविभूषण (मरणोत्तर) पुरस्कारासाठीचा शिफारस प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्यावतीने केंद्रसरकारकडे तातडीने पाठवण्यात यावा अशी विनंती या निवेदनात करण्यात आली आहे.

२८ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या अत्यंत दुर्दैवी अपघातात आपण महाराष्ट्राचे आणि आपल्या सर्वांचे लाडके नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना गमावले. ही महाराष्ट्राची आणि देशाची न भरून निघणारी हानी आहे. अजितदादांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीत महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि औद्योगिक विकासाला एक नवी दिशा दिली. एक कणखर प्रशासक, अहोरात्र कष्ट करणारे लोकप्रतिनिधी आणि 'ॲक्शन ओरिएंटेड' नेते म्हणून त्यांनी जनमानसावर अधिराज्य गाजवले. त्यांच्या या महान राष्ट्रसेवेचा आणि नेतृत्वाचा यथोचित सर्वोच्च गौरव म्हणून त्यांना भारत सरकारचा अत्यंत मानाचा पद्मविभूषण (मरणोत्तर) पुरस्कार जाहीर व्हावा ही महाराष्ट्रातील तमाम जनतेची आणि आमची तीव्र भावना आहे असेही चेतन तुपे यांनी म्हटले आहे.

या निवेदनात राष्ट्रीय नेतृत्व आणि पक्ष संघटना, प्रशासनावरील पकड आणि विकास, शेतकरी आणि सहकार क्षेत्राचे आधारस्तंभ, जनकल्याणाच्या योजना आदी अजितदादांच्या लोकसेवेतील ठळक पैलू मांडण्यात आले आहेत.

अजितदादांचे अचानक जाणे हे एका युगाचा अंत झाल्यासारखे आहे. अशा महान लोकनेत्याच्या अथांग परिश्रमांचा, दूरदृष्टीचा आणि जनसेवेचा मरणोत्तर सर्वोच्च सन्मान होणे हे संपूर्ण राज्यासाठी आणि देशासाठी अभिमानास्पद ठरेल असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व विधानमंडळ सदस्य उपस्थित होते.

## महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघातर्फे वित्त नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे नागपूर** -रविवार दि ०५ जुलै २०२६ रोजी नागपूर जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष मा.प्रेमराज कुबडे सर तसेच महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघाचे केंद्रीय कार्यवाह नंदू बनसोड यांचे नेतृत्वात वित्त-नियोजन राज्यमंत्री मा.ना. ॲड.श्री आशिष जयस्वाल, यांना रामटेक येथील निवासस्थानी शिष्टमंडळ भेटले.



कर्मचारी संघटनेचे नेते नंदू बनसोड यांनी कर्मचारी संघटनेच्या वतीने निवेदन दिले, ग्रंथालय कर्मचारी यांना अत्यल्प वेतन असल्याने फारच हालकीचे जीवन जगत आहे.असे चर्चे दरम्यान कर्मचारी संघटनेच्या महिला नेत्या तथा महिला ग्रंथालय कर्मचारी दर्शना मस्के, योगितताई घंग्रेकर,माधुरीताई टेंभेकर,दुर्गाताई लोंढे, सुरेखाताई बोरकर, निर्मलाताई कुहीटे सौं शारदाताई गजभिये, मनीषा महाजन यांनी मंत्री महोदयांसमोर कर्मचारी अत्यल्प वेतनात कसे काम करीत, कुटुंबाची वाताहात कशी होत आहे. संपूर्ण चित्रण उभे केले, त्याच प्रमाणे उपस्थित असलेले ग्रंथालय कार्यकर्ते सागर लोंढे, कैलास समरीत, जागेश्वर गजभिये, नरेंद्र सहारे, पंढरी कडू, प्रबोधनकार भीमशाहीर तथा पत्रकार प्रदीप कडबे,सुनील बादुले, संघपाल डोंगरे,प्रेमचंद कुसुंबे, श्याम बारई, कार्तिक गायकवाड इत्यादिनी ग्रंथालय चालवीण्यास फारच आर्थिक अडचण भासत आहे. असें आवर्जून सांगितले, कर्मचारी नेते नंदू बनसोड व नागपूर जि. ग्रंथा. संघाचे अध्यक्ष प्रेमराज कुबडे यांनी ग्रंथालय कर्मचारी यांना वेतनश्रेणी लागू करावी त्याच प्रमाणे ग्रंथालयाचे अनुदान तिप्पट वाढ केल्यास ग्रंथालय कर्मचारी यांचा वेतनाचा प्रश्न सहज सुटू शकेल. असें सांगितले, यावर मंत्री महोदयांनी भावानिक परिस्थिती लक्षात घेऊन सांगितले की मी संबंधित सचिव यांचेशी चर्चा करून त्यांनी प्रश्नाची सोडवणूक करतो, आपल्या संघटनेच्या मागण्याचा प्रश्न सोडवितो असें आश्वित केले.या प्रसंगी रामटेक, मौदा, पारशिवनी तालुका मधील कार्यकर्ते उपस्थित होते.

# वाचन संस्कृतीचा 107 वर्षांचा दीपस्तंभ; श्री माणकेश्वर वाचनालयाचा वर्धापन दिन उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात माहितीची विविध माध्यमे उपलब्ध असली, तरी पुस्तकांद्वारे ज्ञान, विचार आणि संस्कारांची परंपरा जपणारे श्री माणकेश्वर वाचनालय हे निफाडच्या वाचन संस्कृतीचा अनमोल ठेवा असल्याचे गौरवोद्गार नगरसेवक साहेबराव बर्डे आणि नगरसेवक संदीप (बंटी) शिंदे यांनी काढले. श्री माणकेश्वर वाचनालयाच्या 107 व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात वाचनालयाचे संचालक श्याम गोळे व सोनाली गोळे यांच्या हस्ते श्रीसत्यनारायण महापूजनाने झाली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला तसेच संस्थापक कै. चिंतामणराव गाडगीळ, कै. भाऊसाहेब उगांवकर, कै. विष्णूपंत सोनवणे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. निफाडचे भूमिपुत्र आणि सर्वोच्च न्यायालयाचे पहिले मराठी न्यायाधीश न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या पुतळ्याचे पूजन नगरसेवक साहेबराव बर्डे व नगरसेवक संदीप (बंटी) शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.




प्रास्ताविकात वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार यांनी 107 वर्षांच्या गौरवशाली वाटचालीचा आढावा घेत वाचनालयाच्या प्रगतीबरोबरच येणाऱ्या विविध अडचणींची माहिती दिली. ग्रामीण भागात सातत्याने वाचन संस्कृती रुजविण्याचे कार्य वाचनालयाने केले असून, विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांमुळे वाचनालयाला स्वतंत्र ओळख निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी सोसायटी संचालक शिवाजी ढेपले, नगरसेवक साहेबराव बर्डे आणि नगरसेवक संदीप शिंदे यांनी मनोगत व्यक्त करताना, ग्रामीण भागात तब्बल 107 वर्षे अखंडपणे सुरू असलेले वाचनालय ही अभिमानाची बाब असून, बदलत्या काळातही वाचन संस्कृती टिकवून ठेवण्याचे कार्य प्रेरणादायी आहे, असे मत व्यक्त केले. समाजात ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी अशा संस्थांची भूमिका महत्त्वाची असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात निफाड नगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल अरुंधती पवार यांचा वाचनालयाच्या वतीने अध्यक्ष मधुकर शेलार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच निफाड तालुका काँग्रेस अल्पसंख्यांक सेलच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अन्वर शेख यांचाही मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी अध्यक्ष मधुकरराव शेलार, सहचिटणीस राहुल दवते, हिशोब तपासणीस दत्ताकाका उगांवकर, संचालक तन्वीर राजे, राजेंद्र खालकर, सुहास सुरळीकर, डॉ. महेश बनकर, सुनील चिखले, गुलाब टकले, श्याम गोळे, सुजाता तनपूरे तसेच सभासद अशोक पगारे, संजय घुमरे, सुनील सोनवणे, प्रवीण तनपुरे, अण्णासाहेब बोरगुडे, राजेंद्र थोरात, विधिज्ञ प्रमोद आहेर, अनुरूप कुंभार्डे, ऋषिकेश वाघ, गणेश कापसे, राहुल नागरे, संपत धारराव, प्रफुल्ल कुलकर्णी, भरत निफाडकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमास ग्रंथपाल नितीन बनसोडे, कर्मचारी नंदकुमार पुंड व अनिता इस्ते यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन संचालक सुहास सुरळीकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. महेश बनकर यांनी मानले.

## डी जी रंगारी यांची वंचित बहुजन आघाडीच्या भंडारा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून निवड

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा विशेष प्रतिनिधी-** 30 जुली जुलै २०२६ ला वंचित बहुजन आघाडीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष व 12 कार्यकारिणी सदस्य यांची निवडणूक होणार आहे त्या निवडणुकीच्या पारदर्शक व वंचित बहुजन आघाडी या पक्षाच्या घटनेप्रमाणे, नियमाने व्यवस्थित पार पाडावी याकरिता प्रत्येक जिल्ह्यातून महाराष्ट्रात निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहेत त्याचप्रमाणे सामाजिक कार्यकर्ते व वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव डी जी रंगारी यांची भंडारा जिल्ह्यातून जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून निवड करण्यात आली आहे त्यांची



पुण्याला एक दिवसीय ट्रेनिंग 10 जुलै 2026 ला होणार असून त्यांच्या निवडी बद्दल जिल्हा महिला अध्यक्ष तनुजा नागदेवे, दिलीप वानखेडे, तालुका अध्यक्ष जगदीश रंगारी, अमित नागदेवे, केवळराम उके, जितेंद्र मेश्राम, यादोराव गणवीर, प्रशिक मोटघरे,गणेश गजभिये, बबिता रामटेके, शितल नागदेवे, प्रतिमा राऊत, रेखा रामटेके, त्रिवेणी मेश्राम अहो इतर कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले

# शिवसेनेच्या (शिंदे गट) पुढाऱ्यांनी दिलेला शब्द पाळणार का? पिंपळा–जऊळका पांदण रस्ता अखेर होणार का?

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे | जिल्हा प्रतिनिधी** : पिंपळा (मालेगाव) विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान पिंपळा येथील श्री.मुंगसाजी माऊली मंदिर परिसरात झालेल्या सभेत शिवसेनेच्या स्थानिक पुढाऱ्याने ग्रामस्थांना दिलेल्या आश्वासनांची आता पुन्हा एकदा आठवण करून देण्यात येत आहे. त्या वेळी आमदार भावनाताई गवळी पाटील यांच्या उपस्थितीत गावातून मोठे मतदान मिळावे, यासाठी "ताई आधीच आमदार आहेत. त्या पुन्हा निवडून येतील किंवा नाही याची चिंता करू नका; मात्र गावातून मोठा लीड द्या. निवडणूक संपताच पिंपळा–जऊळका पांदण रस्त्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावू. शासनाच्या निधीची वाट न पाहता आवश्यक असल्यास मुरूम किंवा खडी टाकूनही रस्ता सुरू करू," असा शब्द दिल्याचा दावा ग्रामस्थ व स्थानिक कार्यकर्ते करीत आहेत.या आश्वासनावर विश्वास ठेवून अनेक कार्यकर्त्यांनी गावोगावी पक्षासाठी मेहनत घेतली, मतदानासाठी जनजागृती केली आणि पक्षाला मोठे मताधिक्य मिळवून देण्यासाठी रात्रंदिवस परिश्रम घेतल्याचे सांगितले जात आहे. मात्र निवडणुकीला दीड ते दोन वर्षांचा कालावधी उलटूनही पिंपळा–जऊळका पांदण रस्त्याच्या कामाला सुरुवात झालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढत आहे.



सध्या या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून पावसाळ्यात चिखलामुळे शेतकऱ्यांना शेतीत जाणे कठीण झाले आहे. महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच शेतीमालाची वाहतूक करणाऱ्या शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेकदा वाहनांची ये-जा बंद होण्याची वेळ येत असल्याने ग्रामस्थांकडून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, प्रचारसभेदरम्यान शासनाच्या निधीचा प्रश्नच उपस्थित केला गेला नव्हता. उलट निधीची प्रतीक्षा न करता स्थानिक पातळीवरूनही रस्ता सुरू करण्याचा शब्द देण्यात आला होता. मात्र आता संबंधित पुढाऱ्यांशी संपर्क साधल्यास "राज्यातच पांदण रस्त्यांसाठी निधी मंजूर झालेला नाही, निधी मिळाल्यानंतरच काम होईल," असे उत्तर दिले जात असल्याचा आरोप ग्रामस्थ करीत आहेत. त्यामुळे निवडणुकीपूर्वी दिलेली भूमिका आणि सध्याची भूमिका यात मोठा फरक असल्याची चर्चा गावात सुरू आहे.

ग्रामीण भागात यामुळे शिवसेनेच्या स्थानिक नेतृत्वाबाबत नाराजी वाढत असल्याचे बोलले जात आहे. अनेक कार्यकर्त्यांमध्येही अस्वस्थता असून, निवडणुकीत दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी आता लोकप्रतिनिधींनी आणि पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने स्वतः लक्ष घालण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

ग्रामस्थांनी आमदार भावनाताई गवळी पाटील यांनी स्वतः मतदारसंघात दौरा करून प्रलंबित प्रश्नांची पाहणी करावी, पिंपळा–जऊळका पांदण रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी आणि किमान मुरूम टाकून वाहतुकीची व्यवस्था त्वरित उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. अन्यथा आगामी पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये नागरिकांकडून तीव्र लोकक्षोभ निर्माण होऊ शकतो, अशी भावना गावकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.

"प्रचारसभेत शासनाच्या निधीची वाट पाहणार नसल्याचे सांगितले गेले होते. मग आता निधी नसल्याचे कारण का दिले जात आहे? दिलेला शब्द पाळून पिंपळा–जऊळका पांदण रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे. हा प्रश्न केवळ रस्त्याचा नसून शेतकऱ्यांच्या दैनंदिन जगण्याशी निगडित आहे," अशी मागणी पिंपळा येथील ग्रामस्थ व स्थानिक कार्यकर्त्यांनी केली आहे.

वरिष्ठ नेतृत्वाने लक्ष घालण्याची मागणी पिंपळा–जऊळका पांदण रस्त्याचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करून नागरिकांचा विश्वास कायम ठेवण्यासाठी वरिष्ठ नेतृत्वाने जातीने लक्ष घालून तातडीने रस्त्याचे काम सुरू करावे, अशी मागणी शेतकरी, ग्रामस्थ आणि स्थानिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे.

## प्रशासनाचे बारीक लक्ष; बहुतांश नद्या इशारा पातळीच्या खाली वाहत असल्याने पूरपरिस्थिती नियंत्रणात

**नवी मुंबई :** कोकण विभागात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर जलसंपदा विभाग आणि जिल्हा प्रशासनाकडून नद्यांच्या पाणीपातळीवर अत्यंत बारकाईने लक्ष ठेवले जात असून, सध्या विभागातील पूरपरिस्थिती पूर्णपणे प्रशासकीय नियंत्रणात असल्याचे दिलासादायक चित्र आहे. उपलब्ध झालेल्या ताज्या अधिकृत आकडेवारीनुसार, कोकण विभागातील एकूण २७ प्रमुख नद्यांपैकी केवळ ३ नद्या वगळता इतर सर्व नद्या सध्या इशारा पातळीच्या खाली वाहत आहेत. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, काही ठिकाणी नद्यांनी इशारा पातळी ओलांडली असली, तरी सर्व यंत्रणा सतर्क असून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या उपाययोजना युद्धपातळीवर सुरू आहेत.

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यातील उल्हास नदी बदलापूर येथे १३.९० मीटर पातळीवर वाहत असून येथील धोका पातळी १७.५० मीटर आणि इशारा पातळी १६.५० मीटर आहे. अंबरनाथमधीलच जांभूळपाडा येथे उल्हास नदी ११.७० मीटरवर (धोका १४.०० मीटर, इशारा १३.०० मीटर) तर कल्याण येथील मोहने भागात ती ६.५० मीटरवर (धोका १०.०० मीटर, इशारा ९.०० मीटर) वाहत आहे. शहापूर तालुक्यातील भातसा नदीची पातळी ३१.५० मीटर असून ती देखील ३६.०६ मीटरच्या इशारा पातळीपेक्षा खाली आहे. मात्र, टिटवाळा येथील काळू नदीने १०२.०० मीटरची इशारा पातळी ओलांडली असून ती सध्या १०२.३५ मीटरवर वाहत आहे, तर तिची धोका पातळी १०३.५० मीटर आहे.

पालघर तालुक्यातील सूर्या नदी (मासवण) ५.०५ मीटरवर (धोका १२.१० मीटर, इशारा ११.०० मीटर), वैतरणा नदी १०१.६५ मीटरवर (धोका १०२.१० मीटर, इशारा १०१.९० मीटर) आणि पिंजाळ नदी १०२.७५ मीटरवर वाहत असून ती अचूकपणे तिच्या इशारा पातळीवर स्थिर आहे, तर तिची धोका पातळी १०२.९५ मीटर इतकी आहे.रायगड जिल्ह्यातील रोहा येथील कुंडलिका नदी २२.८० मीटरवर (धोका २३.९५ मीटर, इशारा २३.०० मीटर) वाहत असून ती नियंत्रणात आहे. मात्र, रोहा तालुक्यातीलच अंबा नदीने ९.०० मीटरची धोका पातळी ओलांडली असून ती सध्या १०.०० मीटर या पातळीवर वाहत आहे, जिची इशारा पातळी ८.०० मीटर आहे. महाड येथील सावित्री नदी ३.९० मीटरवर (धोका ६.५० मीटर, इशारा ६.०० मीटर), पनवेल येथील पाताळगंगा नदी १९.८० मीटरवर (धोका २१.५२ मीटर, इशारा २०.५० मीटर), कर्जत येथील उल्हास नदी ४५.५० मीटरवर (धोका ४८.७७ मीटर, इशारा ४८.१० मीटर) आणि पनवेलमधील गाढी नदी ३.९० मीटरवर (धोका ६.५५ मीटर, इशारा ६.०० मीटर) वाहत असल्याने या भागात सध्या कोणतीही गंभीर परिस्थिती निर्माण झालेली नाही.

रत्नागिरीतील खेड येथील जगबुडी नदीने ५.०० मीटरची इशारा पातळी ओलांडली असून ती सध्या ६.२० मीटरवर वाहत आहे, तर तिची धोका पातळी ७.०० मीटर आहे. जिल्ह्यातील इतर नद्यांमध्ये चिपळूणची वशिष्ठी नदी ३.३४ मीटरवर (धोका ७.०० मीटर), संगमेश्वरची शास्त्री नदी ३.८० मीटरवर (धोका ७.८० मीटर) व सोनवी नदी ३.४० मीटरवर (धोका ८.६० मीटर), लांजा येथील काजळी नदी १३.९० मीटरवर (धोका १८.५० मीटर) व मुचकुंदी नदी १.४० मीटरवर (धोका ४.५० मीटर), राजापूरची कोदवली नदी ३.७० मीटरवर (धोका ८.१३ मीटर) आणि संगमेश्वरची बावनदी ६.२५ मीटरवर (धोका ११.०० मीटर) वाहत आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात सर्वच नद्या पूर्णपणे शांत असून दोडामार्ग येथील तिलारी नदी ३८.३० मीटरवर (धोका ४३.६० मीटर), सावंतवाडी येथील तेरेखोल नदी २.२० मीटरवर (धोका ६.२६ मीटर), कुडाळची कर्ली नदी ५.०० मीटरवर (धोका १०.९१ मीटर), कणकवलीची गडनदी ३४.६५ मीटरवर (धोका ३७.९२ मीटर) आणि वैभववाडी येथील वाघोठन नदी ५.०० मीटरवर (धोका १०.५० मीटर) वाहत आहे. सर्व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले असून नदीकाठच्या नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## दर्यापूरात महिन्यातून एकदा UDID कार्ड शिबिर भरवावे

**भाजपा अजा मोर्चा मेळघाट जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांची खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्याकडे मागणी**

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी**

**दर्यापूर** : दर्यापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात महिन्यातून किमान एक दिवस UDID (Unique Disability ID) कार्ड तपासणी व नोंदणी शिबिर आयोजित करण्यात यावे, अशी मागणी भाजपा अनुसूचित जाती (अजा) मोर्चा मेळघाट जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांनी राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सध्या UDID कार्डासाठी आवश्यक असलेली वैद्यकीय तपासणी व नोंदणी प्रक्रिया अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दर बुधवारी राबविण्यात येते. त्यामुळे दर्यापूर तालुक्यासह ग्रामीण भागातील दिव्यांग नागरिकांना अमरावतीपर्यंत प्रवास करावा लागतो. शारीरिक अडचणी, प्रवासाचा खर्च, वेळेचा अपव्यय तसेच सोबत नातेवाईक घेऊन जाण्याची गरज यामुळे दिव्यांग नागरिकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.



दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात महिन्यातून एक दिवस UDID कार्ड शिबिर आयोजित करण्यात आल्यास तालुक्यातील शेकडो दिव्यांग नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. तसेच शासनाच्या विविध दिव्यांग कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेले UDID कार्ड स्थानिक पातळीवर सहज उपलब्ध होईल, असेही नकुल सोनटक्के यांनी नमूद केले आहे.

यासंदर्भात जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती यांना आवश्यक सूचना देऊन दर्यापूर येथे नियमित मासिक UDID शिबिर सुरू करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी विनंती खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्याकडे करण्यात आली आहे.

दर्यापूर तालुक्यातील दिव्यांग नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन ही मागणी तातडीने मान्य करून उपजिल्हा रुग्णालयात नियमित मासिक UDID कार्ड शिबिर सुरू करण्यात यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**खासदार डॉ. अनिल बोंडे यांना निवेदन**

भाजपा अनुसूचित जाती मोर्चा मेळघाट जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांनी राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांना निवेदन सादर करून दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात दर महिन्याला नियमित UDID कार्ड तपासणी व नोंदणी शिबिर सुरू करण्याची मागणी केली आहे.

दिव्यांग नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन शासनस्तरावर आवश्यक कार्यवाही करून हे शिबिर तातडीने सुरू करावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## पावसाळ्यात वारंवार पोट का बिघडतं?

पावसाळा सुरू झाला की सर्दी, खोकला, ताप यासोबत पोटात दुखण्याची समस्या प्रकर्षाने जाणवते. याचे मुख्य कारण म्हणजे पावसाळ्यात हवेत वाढणारी आर्द्रता. ज्यामुळे बॅक्टेरिया, व्हायरस आणि बुरशीची वाढ खूप वेगाने होते. या दिवसांत पाणी आणि अन्न दूषित होण्याचा धोका सर्वाधिक असतो. त्यातच आपली पचनशक्तीदेखील मंदावलेली असते. अशा वेळी बाहेरील उघड्यावरील अन्न खाणे किंवा दूषित पाणी प्यायल्यास गॅस, अपचन, डायरिया आणि फूड पॉयझनिंगसारख्या समस्या लगेच डोके वर काढतात. त्यामुळे या दिवसांत पोट बिघडण्याची नेमकी कारणे कोणती आणि स्वतःला सुरक्षित कसे ठेवावे, हे जाणून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

**दुषित पाणी –**

पावसाळ्यात पाण्याचे स्रोत लवकर दूषित होतात, ज्यामुळे संसर्गाचा धोका वाढतो. असे दुषित पाणी प्यायल्यास बाहेरील जंतू हे शरीरामध्ये लवकर जातात आणि पोटाच्या तक्रारी वाढतात. म्हणून पाणी उकळून प्यावे.

**मंद झालेली पचनशक्ती –**

या ऋतूत शरीराची पचनशक्ती मंदावते. त्यामुळे जड किंवा तेलकट अन्न पचण्यास त्रास होतो.

**अन्न विषबाधा –**

या दिवसात दमटपणामुळे अन्न लवकर खराब होते. त्यामुळे ताजे अन्न आणि गरम अन्न खाण्यास प्राधान्य द्यावे.

**माश्यांकडून होणारा संसर्ग –**

उघड्या अन्नावर बसणाऱ्या माश्या हानिकारक जंतू सोडतात, ज्यामुळे पोटदुखी होऊ शकते. म्हणून, अन्न नेहमी भांड्यांनी झाकून ठेवा.

**स्ट्रीट फूड –**

पावसाळ्यात गरमागरम भजी, चाट किंवा उघड्यावरील खाद्यपदार्थ खाण्याची इच्छा होते. मात्र, दूषित पाणी आणि अस्वच्छतेमुळे हे अन्न पोटाच्या इन्फेक्शनला थेट आमंत्रण ठरते.

पावसाळा एन्जॉय करताना आरोग्याशी तडजोड करू नका. पोटाचा त्रास सुरू झाल्यास स्वतःच्या मनाने औषधे न घेता तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# वयाच्या ७५ वर्षांपूर्वी प्रत्येक दहाव्या भारतीयाला कर्करोगाचा धोका!

भारतामध्ये कर्करोगाचा वाढता प्रादुर्भाव ही चिंतेची बाब ठरत असून वयाच्या ७५ वर्षांपूर्वी प्रत्येक दहा भारतीयांपैकी एका व्यक्तीला कर्करोग होण्याचा धोका असल्याचे जागतिक आरोग्य संघटना आणि आंतरराष्ट्रीय कर्करोग संशोधन संस्था यांच्या ताज्या आकडेवारीतून समोर आले आहे. बदलती जीवनशैली, तंबाखूचे वाढते सेवन, प्रदूषण, लठ्ठपणा आणि उशिरा होणारे निदान यामुळे देशातील कर्करोगाचे ओझे सातत्याने वाढत असल्याचे या अहवालातून स्पष्ट झाले आहे.

आकडेवारीनुसार भारतात २०२४ मध्ये सुमारे १५.३३ लाख नवीन कर्करोग रुग्णांची नोंद होण्याचा अंदाज आहे. याशिवाय लाखो नागरिक कर्करोगाशी झुंज देत असून, या आजारामुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणात मृत्यूही होत आहेत. तज्ज्ञांच्या मते, लोकसंख्येतील वाढ, आयुर्मानात झालेली वाढ आणि बदलती जीवनशैली



यामुळे येत्या काही वर्षांत कर्करोगाच्या रुग्णसंख्येत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.महिलांमध्ये स्तनाचा आणि गर्भाशयमुखाच्या कर्करोगाचे प्रमाण सर्वाधिक असून, पुरुषांमध्ये तोंड, फुफ्फुस, अन्ननलिका आणि पोटाच्या कर्करोगाचे प्रमाण अधिक आहे. विशेषतः तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणाऱ्या व्यक्तींमध्ये तोंड आणि फुफ्फुसाच्या कर्करोगाचा धोका अनेक पटींनी वाढत असल्याचे तज्ज्ञांनी नमूद केले आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या विश्लेषणानुसार भारतातील सुमारे ३७ टक्के कर्करोग पूर्णपणे टाळता येण्यासारखे आहेत. म्हणजेच दरवर्षी जवळपास ५.२ लाख कर्करोगाची प्रकरणे केवळ तंबाखूपासून दूर राहणे, मद्यसेवन टाळणे, संतुलित आहार, नियमित व्यायाम, लसीकरण आणि वेळेवर तपासणी यांसारख्या उपायांनी रोखता येऊ शकतात. त्यामुळे उपचारापेक्षा प्रतिबंधावर अधिक भर देण्याची गरज तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

भारतामध्ये कर्करोगाचे निदान बहुतांश वेळा उशिरा होत असल्याचेही या अहवालातून अधोरेखित झाले आहे. सुरुवातीच्या टप्प्यात लक्षणे किरकोळ वाटल्याने अनेक रुग्ण डॉक्टरांकडे जाणे टाळतात. परिणामी आजार तिसऱ्या किंवा चौथ्या टप्प्यात पोहोचल्यानंतरच निदान होते. त्यामुळे उपचार अधिक गुंतागुंतीचे, दीर्घकालीन आणि खर्चिक ठरतात. तोंडातील न भरून येणारी जखम, दीर्घकाळ खोकला, गिळताना त्रास, वजन झपाट्याने कमी होणे, शरीरात गाठ जाणवणे किंवा शौच-मूत्राच्या सवयींमध्ये बदल अशी लक्षणे दिसल्यास तातडीने तपासणी करून घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, कर्करोगाविरुद्धची सर्वात प्रभावी लढाई म्हणजे जनजागृती आणि लवकर निदान. स्तनाचा, गर्भाशयमुखाचा, तोंडाचा आणि मोठ्या आतड्याच्या कर्करोगासाठी नियमित तपासणी केल्यास अनेक रुग्णांमध्ये आजार सुरुवातीच्या अवस्थेतच सापडतो आणि उपचारांचे यशही लक्षणीयरीत्या वाढते. तसेच मुलींना एचपीव्ही आणि नागरिकांना हेपॅटायटिस-बी लसीकरणाचा लाभ मिळाल्यास काही प्रकारच्या कर्करोगांचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो.

कर्करोगाच्या वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर देशातील आरोग्य व्यवस्थेवरही मोठा ताण येत आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागात निदान व उपचारांच्या सुविधा अद्याप अपुऱ्या आहेत. अनेक रुग्णांना उपचारासाठी मोठ्या शहरांमध्ये जावे लागते. त्यामुळे परवडणारे उपचार, अधिक कर्करोग तपासणी केंद्रे आणि प्राथमिक स्तरावरच स्क्रीनिंगची सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान वाढत्या कर्करोगाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारकडूनही प्रतिबंधात्मक उपायांवर भर दिला जात असून तंबाखूमुक्त भारत, नियमित तपासणी आणि जनजागृती मोहिमा अधिक प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे. आरोग्य तज्ज्ञांचे मत स्पष्ट आहे की कर्करोग हा केवळ उपचारांचा विषय नसून, तो प्रतिबंध, वेळेवर निदान आणि निरोगी जीवनशैली यांचा एकत्रित परिणाम आहे. योग्य वेळी खबरदारी घेतल्यास लाखो भारतीयांना या गंभीर आजारापासून वाचविणे शक्य आहे.

# पावसाळ्यात भटकंतीसाठी महाराष्ट्रातील ६ सर्वोत्तम ठिकाणे

## जिथे ढग डोंगररांगांच्या कुशीत विसावतात...

करड्या रंगाचे ढग दाटून येताच तहानलेली जमिन पावसांच्या सरीने अगदी ओलिचिंब होऊन जाते. निसर्ग धो-धो पाऊस अंगावर झेलत असताना पर्यटकांना भटकंतीचे वेड लागते. मग अशावेळी निसर्गाच्या सानिध्यात चार सुखाचे क्षण अनुभवण्यासाठी महाराष्ट्रात सहा सर्वोत्तम ठिकाणे आहेत. जून महिन्यात पावसाची चाहुल लागताच सह्याद्रीच्या पर्वतरांगा, दाटून येणारे ढग, घनदाट जंगल पर्यटकांना आकर्षित करतात. तुडुंब भरुन वाहणाऱ्या नद्या, डोंगरमाथ्यावरुन वाहणारे धबधबे, घनदाट जंगलांमध्ये पसरलेली हिरवळ चादर आणि निसर्गाची किमया डोळ्यांना थक्क करते.

**१) जव्हार**


पालघर जिल्ह्यात वसलेले जव्हार हे ठिकाण महाराष्ट्रातील ‘दार्जिलिंग’ म्हणून ओळखले जाते. बहुदा या ठिकाणाबाबत फार कमी पर्यटकांना माहिती आहे. घनदाट जंगलाने वेढलेल्या या परिसराला ऐतिहासिक महत्त्व आहे. शिवाय जव्हारला आदिवासी सांस्कृतिक वारसाही लाभला आहे. या परिसरातील शांतता पर्यटकांच्या मनाला स्पर्श करुन जाते. येथील ५०० फुटांपेक्षा अधिक उंचीवरुन कोसळणारा दाभोसा धबधबा राज्यातील उंच धबधब्यांपैकी एक आहे. हाच धबधबा जव्हारचे मुख्य आकर्षण आहे. पावसाची चाहुल लागताच शांतता आणि नैसर्गिक सानिध्यात राहण्याच्या उद्देशाने पर्यटक या ठिकाणी गर्दी करतात. मुख्य वैशिष्ट्य म्हणजे या भागातील डोंगररांगांमध्ये वारली समुदाय पिढ्यानपिढ्या वास्तव्यास आहे. गावातील घरांच्या मातीच्या भिंतींवर पांढऱ्या रंगाने रेखाटलेली भौमितिक वारली चित्रकला त्यांच्या समृद्ध कलाकुसरीची साक्ष देतात.


**२)चिखलदरा**

सातपुडा पर्वतरांगांमध्ये बहरलेले चिखलदरा महाराष्ट्रातील एकमेव कॉफीचे उत्पादन घेणारे थंड हवेचे ठिकाण आहे. समुद्रसपाटीपासून १,११८ मीटर उंचीवर वसलेला हा भाग म्हणजे पर्यटकांसाठी पर्वणीच. हे ठिकाण पश्चिम घाटाच्या मुख्य गर्दीपासून दूर असल्यामुळे येथील शांत आणि निवांत वातावरण मनाला एक वेगळीच अनुभूती देऊन जाते. जून महिन्यात निसर्गाने साद घालताच कॉफीच्या बागांनी नटलेला हा परिसर अधिकच नयनरम्य आणि विलोभनीय दिसतो. चिखलदरा जवळच असलेला मेळघाट व्याघ्रप्रकल्प सकाळच्या डोंगर-दऱ्यांच्या दाट धुक्यांमध्ये हरवून जातो. हे निसर्गाचे एक अनोखे रुप पाहणे म्हणजे स्वर्गसुखच आहे. तसेच घनदाट जंगलामधून झेपावणाऱ्या भीमकुंड धबधब्याचे रुप अनुभवण्यासारखे आहे. प्रचंड वेगाने कोसळणाऱ्या या धबधब्याच्या सानिध्यात असताना प्रत्येकाच्या ओठांवरील शब्दच हरवून जातात.


**३)माथेरान**


वाहनांच्या गजबजाटापासून दूर असलेले भारतातील एकमेव थंड हवेचे ठिकाण म्हणजे माथेरान. जून महिन्यात या ठिकाणाचे सौंदर्य अधिकच बहरते. दाट धुक्याची चादर पसरलेल्या घनदाट जंगलामधून मार्ग काढत टॉय ट्रेन जेव्हा धावते तेव्हा निसर्गाचे मनमोहक रुप अनुभवायला मिळते. लाल मातीचे रस्ते निवांत शांततेत विसावलेले बघताना मन बहरुन जाते. इको पॉईंट, पॅनोरमा पॉईंट आणि मंकी पॉईंट यांसारखी प्रसिद्ध प्रेक्षणीय ठिकाणे धुक्यामध्ये हरवून जातात. पण मजेशीर गोष्ट म्हणजे, निसर्गाचा हाच लपंडाव मनाला सर्वाधिक भुरळ पाडतो. डोळ्यांना दरीचे विस्तीर्ण रूप गवसण्यापूर्वीच तिचा आवाज आपल्या कानावर पडतो. पावसाळ्याच्या संथ लयीत हरवलेल्या या ठिकाणाकडे मन भरुन बघत असताना निसर्गाप्रती एक कृतज्ञतेची भावना दाटून येते.











**४)कोयनानगर**

निवांत पर्यटन (Slow Tourism) या आधुनिक संकल्पनेचा पर्यटकांना परिचय होण्यापूर्वीच कोयना नगरमध्ये संथ आणि निवांत क्षण अनेक वर्षांपासून प्रत्यक्षात अनुभवता येत आहेत. कोयना धरणाच्या आधारे निर्माण झालेल्या विस्तीर्ण शिवसागर तलावाच्या शेजारी वसलेले सातारा जिल्ह्यातील हे ठिकाण पर्यावरण-संवेदनशील क्षेत्रात येते. हेच लक्षात घेऊन येथे जाणीवपूर्वक आणि गरजेनुसारच विकास मर्यादित ठेवण्यात आला आहे. जूनमध्ये पावसाचा जोर वाढत असताना येथील वनराईला नवा बहर येतो. दिवसागणिक जंगल अधिकच घनदाट रूप धारण करते. वासोटा किल्ल्यापर्यंत पोहोचण्यासाठी शिवसागर तलावामधून बोटीने प्रवास करण्याचा अनुभव म्हणजे निसर्गाचे एक अनोखे वरदान आहे. या प्रवासादरम्यान किल्ल्यापर्यंत पोहोचण्याची उत्सुकता आणखीनच वाढते.

**५)माळशेजघाट**

महाराष्ट्रातील पावसाळा अनुभवण्यासाठी कोकण रेल्वेचा प्रवास जितका सुंदर वाटतो, तितकाच माळशेज घाटही मनाला भुरळ पाडतो. या दिवसांमध्ये माळशेज घाटात जाणे म्हणजे निसर्गाच्या पानावर उमटलेली एक कविता अनुभवण्यासारखे आहे. डोंगर-दऱ्यांमधून कोसळणारे धबधबे घाटात पांढऱ्याशुभ्र चादरीसारखे भासतात. तसेच या ठिकाणाजवळच असलेल्या पिंपळगाव जोगा धरणाच्या जलाशयामध्ये कधीकधी फ्लेमिंगो पक्ष्यांचे दर्शनही घडते. चहूबाजूंनी दाट धुक्यामध्ये हरवलेल्या माळशेज घाटाचे रूप न्याहाळताना मन प्रसन्न होते. जवळच असलेला हरिश्चंद्रगड अनुभवी गिर्यारोहकांना साद घालतो. तसेच फक्त पावसात उभे राहून जगण्याचा निखळ आनंद घेऊ इच्छिणाऱ्यांना हा घाट आपलेसे करतो.

**६)आंबोली**

महाराष्ट्राच्या कोकण किनारपट्टीच्या दक्षिण टोकाला वसलेले आंबोली हे खूप सुंदर पण अजूनही पर्यटकांच्या नजरेआड असलेले थंड हवेचे ठिकाण आहे. आजच्या सोशल मीडियाच्या काळातही येथील धबधबे आणि प्रेक्षणीय ठिकाणे एका नवीन प्रवासाचा अनुभव देतात. आंबोली घाटात सह्याद्रीतील सर्वात जास्त पाऊस पडतो. येथील जंगलात अतिशय दुर्मिळ असा ‘आंबोली बुश फ्रॉग’ हा बेडूक आढळतो. निसर्गप्रेमी आणि वन्यजीव संशोधकांसाठी हे ठिकाण खऱ्या अर्थाने मुख्य आकर्षणाचे केंद्र आहे. जून महिन्याच्या सुरुवातीलाच संपूर्ण परिसरात पसरलेली दाट धुक्यांची चादर, छोटे-मोठे धबधबे आणि बेडकांचे एकाच सुरात ओरडणे पर्यटकांना एका वेगळ्याच दुनियेत घेऊन जाते. आंबोली म्हणजे महाराष्ट्रातील पावसाळ्याचे सर्वात सुंदर आणि देखणे रुप आहे.

पावसाळ्याच्या दिवसांमध्ये महाराष्ट्रभर भटकंती करत असताना अनेक गोष्टी साद घालतात. धो-धो पावसात भिजण्याची, प्रवासातील विलंबाचा आनंद लुटण्याची, नव्या वाटांवरुन प्रवास करण्याची, कधीतरी एखाद्या ढाब्यावर थांबून चहा पिण्याची, कुठेही पोहोचण्याची घाई नसताना वेळेचे भान विसरुन विसावण्याची तुमची तयारी असायला हवी. शेवटी हाच प्रवासाचा सर्वात सुंदर अनुभव आहे, हेच खरे.

**आमच्या बद्दल:**

महाराष्ट्र पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागची ३१ मे २०१६ रोजी स्थापना झाली. राज्याचा समृद्ध सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी आणि पर्यटन क्षेत्र अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने या विभागाची स्थापना करण्यात आली. पर्यटन आणि संस्कृती यांची नाळ एकमेकांशी घट्ट जोडलेली आहे. कारण ऐतिहासिक स्मारके, लोककला आणि स्थानिक परंपरा या केवळ सांस्कृतिक ठेवा नसून पर्यटन आकर्षण म्हणूनही ओळखल्या जातात. हेच लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि या क्षेत्रांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी स्वतंत्र मंत्रिमंडळ स्तरावरील विभाग स्थापन केला.

सदर विभाग महाराष्ट्रातील अद्वितीय कला प्रकार, परंपरा आणि ऐतिहासिक स्थळे जपण्यासाठी, त्यास प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांची जागतिक स्तरावर ओळख निर्माण करण्यासाठी कार्य करतो. तसेच, सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवून, पर्यटन विकासाला चालना देऊन हा विभाग राज्याच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीमध्ये महत्त्वाचे योगदान देत आहे. सदर विभागाच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्र राज्य केवळ एक पर्यटन स्थळ म्हणूनच नव्हे, तर एक जिवंत संस्कृती आणि वारसा असलेले राज्य म्हणून अधिक समृद्ध आणि आकर्षक बनत आहे.

# राज्य शासनाची कर्जमुक्ती : शाश्वत कृषी विकासाचे धोरण

शेती ही महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून राज्यातील लाखो कुटुंबांच्या उपजीविकेचा मुख्य आधार आहे. मात्र, हवामानातील अनिश्चितता, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, वाढता उत्पादन खर्च, बाजारपेठेतील चढ-उतार आणि कर्जाचा वाढता बोजा यामुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडतात. अशा परिस्थितीत केवळ तात्पुरता दिलासा देणे पुरेसे नसून शेतकरी पुन्हा आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल, उत्पादनक्षम बनेल आणि भविष्यात कर्जाच्या दुष्टचक्रात अडकणार नाही, अशी दीर्घकालीन व्यवस्था उभी करणे आवश्यक ठरते.

याच व्यापक दृष्टिकोनातून राज्य शासनाने ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६’ राबविण्याचा निर्णय घेतला आहे. सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देणारी आणि सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांची ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित नसून शाश्वत कृषी विकासाच्या व्यापक धोरणाचा महत्त्वाचा भाग म्हणून पाहिली जात आहे.

कर्जमुक्तीचा मूलभूत उद्देश शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देणे हा असला, तरी त्यामागील व्यापक विचार अधिक महत्त्वाचा आहे. कर्जमुक्त झालेला शेतकरी पुन्हा पतपुरवठ्यास पात्र होतो. नव्याने पीककर्ज उपलब्ध झाल्यामुळे तो वेळेवर बियाणे, खते, औषधे आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर करू शकतो. यामुळे उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होते आणि शेती अधिक सक्षम बनते.

या योजनेतील सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे विविध प्रकारच्या शेतकऱ्यांचा विचार करण्यात आला आहे. दोन लाख रुपयांपर्यंतची थकीत कर्जे असलेल्या पात्र शेतकऱ्यांना थेट कर्जमुक्ती दिली जात आहे. त्याचबरोबर दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता (One Time Settlement – OTS) योजना उपलब्ध करून देण्यात आली आहे. अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर अशा शेतकऱ्यांनाही कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे मोठ्या कर्जबाजारी शेतकऱ्यांनाही आर्थिक पुनरुज्जीवनाची संधी उपलब्ध झाली आहे.

शासनाने नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचाही विशेष विचार केला आहे. त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे आर्थिक शिस्त, वेळेवर कर्जफेड आणि बँकिंग व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होण्यास मदत होईल. ही बाब शाश्वत वित्तीय व्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

योजनेची संपूर्ण अंमलबजावणी डिजिटल माध्यमातून केली जात आहे. महाआयटीच्या प्रणालीद्वारे आधार प्रमाणीकरण, ऑनलाइन पडताळणी, बँकांची संगणकीय माहिती आणि थेट लाभ वितरणामुळे प्रक्रिया अधिक पारदर्शक, वेगवान आणि विश्वासार्ह झाली आहे. लाभार्थ्यांच्या याद्या ग्रामपंचायत, बँका, विकास संस्था आणि आपले सरकार सेवा केंद्रांमध्ये प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. मोबाईल संदेशाद्वारे लाभार्थ्यांना माहिती देण्याची तसेच तक्रार निवारणाची स्वतंत्र यंत्रणाही उभारण्यात आली आहे. यामुळे प्रशासनातील पारदर्शकता आणि लोकांचा विश्वास अधिक बळकट होईल.

शाश्वत कृषी विकासाचा विचार केवळ कर्जमुक्तीपर्यंत मर्यादित राहत नाही. राज्य शासनाचे उद्दिष्ट शेतकऱ्यांना बारमाही सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून देणे, शेतीमालावर आधारित उद्योग-व्यवसायांना चालना देणे, कृषी प्रक्रिया उद्योगांचा विस्तार करणे, शेतीमालाला योग्य बाजारभाव मिळवून देणे, तातडीच्या पणन व्यवस्था विकसित करणे, वेळेवर पतपुरवठा सुनिश्चित करणे आणि ग्रामीण भागात आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे हे आहे. या सर्व बाबी परस्परपूरक असून त्यांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास आणि शेती अधिक लाभदायक होण्यास मदत होईल.

सिंचनाचा विस्तार झाल्यास पावसावरील अवलंबित्व कमी होईल. आधुनिक तंत्रज्ञान, सूक्ष्म सिंचन, जलसंधारण आणि पीक नियोजन यामुळे उत्पादनात वाढ होईल. प्रक्रिया उद्योग उभारल्यास शेतीमालाला मूल्यवर्धन मिळेल आणि ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीला चालना मिळेल. सक्षम पणन व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळण्यास मदत होईल. या सर्व घटकांची सांगड कर्जमुक्तीशी घालण्यात आल्याने ही योजना शाश्वत कृषी विकासाच्या व्यापक आराखड्याचा भाग ठरते.

आजच्या काळात हवामान बदल हे शेतीसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या सक्षम, तांत्रिकदृष्ट्या आधुनिक आणि बाजारपेठेशी जोडलेला शेतकरी निर्माण करणे ही काळाची गरज आहे. कर्जमुक्तीमुळे निर्माण होणारे आर्थिक स्थैर्य, वेळेवर मिळणारा पतपुरवठा, आधुनिक शेती पद्धतींचा स्वीकार आणि मजबूत कृषी पायाभूत सुविधा या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे अधिक शाश्वत, सक्षम आणि स्पर्धात्मक कृषी व्यवस्था होय.

‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६’ ही त्यामुळे केवळ कर्जमाफीची योजना नाही. ती शेतकऱ्याला नव्याने उभारी देणारी, आर्थिक विश्वास पुनर्स्थापित करणारी, डिजिटल सुशासनाला चालना देणारी आणि कृषी क्षेत्राच्या दीर्घकालीन शाश्वत विकासाला दिशा देणारी महत्त्वपूर्ण योजना आहे. आर्थिक दिलासा, पतपुरवठा, सिंचन, आधुनिक तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योग, बाजारपेठ आणि पायाभूत सुविधांचा समन्वय साधून शेतकऱ्यांचे जीवन अधिक सुखी, समृद्ध आणि आत्मनिर्भर करण्याच्या राज्य शासनाच्या व्यापक धोरणातील हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक,**
**विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**

# रायगड जिल्ह्यात २४ तासांत सर्वाधिक ७१.४ मिमी पावसाची नोंद

**मुंबई :** राज्यात मान्सून सक्रिय असून यंदाच्या पावसाळ्यात १ जून पासून राज्यात सरासरी ३३२ मिमी पाऊस झाला आहे, अशी माहिती राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली आहे.

सकाळी ११ वाजेपर्यंत दिलेल्या प्राप्त माहितीनुसार मागील २४ तासांत रायगड जिल्ह्यात सर्वाधिक ७१.४ मिमी पाऊस झाला. कोकण, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाची नोंद झाली आहे.

त्याखालोखाल ठाणे, सातारा आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी ३७.२ मिमी, तर मुंबई उपनगर जिल्ह्यात ३२.४ मिमी, रत्नागिरीमध्ये ३७.२ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

राज्याच्या विविध भागांमध्ये झालेल्या या समाधानकारक पावसामुळे मान्सूनची सक्रियता कायम असल्याचे स्पष्ट होत आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली असून, नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# मावळातील प्रमुख पर्यटनस्थळांवर बंदी आदेश लागू

**मुंबई :** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांची वाढती गर्दी, संभाव्य अपघात तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील प्रमुख पर्यटनस्थळांवर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १६३ लागू करण्यात आले आहे. हा आदेश ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत लागू राहणार आहे.

या आदेशानुसार मावळ तालुक्यातील मौजे लोणावळा परिसरातील भाजे धबधबा, लोहगड किल्ला, विसापूर किल्ला, तिकोणा किल्ला, तुंग किल्ला, टायगर पॉईंट, लायन्स पॉईंट , शिवलिंग पाईन्ट, एकविरा देवी कार्ला लेणी तसेच पवना धरण परिसर या प्रमुख पर्यटनस्थळांवर बंदी आदेश लागू करण्यात आली आहेत.

पर्यटकांनी धोकादायक ठिकाणी जाणे, पाण्यात उतरणे, वाहतूक कोंडी, सार्वजनिक शांततेचा भंग आणि अपघात टाळण्यासाठी प्रशासनाने ही प्रतिबंधात्मक उपाययोजना केली आहे.

प्रशासनाने पर्यटकांना आदेशातील सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन केले असून, धोकादायक कडे, धबधबे आणि पाणीसाठ्यांच्या परिसरात सुरक्षिततेची काळजी घेण्यास सांगितले आहे. तसेच प्रशासन, पोलीस आणि संबंधित यंत्रणांनी दिलेल्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ तसेच इतर लागू कायद्यांनुसार कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.